दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ४१ । शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

आ. महेश बालदी यांना तीन वर्षांचा सश्रम कारावास

रायगड : उरणचे भाजप आमदार महेश बालदी यांच्यासह चार जणांना अलिबाग येथील मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयाने तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. २०१० मधील मारहाणीच्या प्रकरणात न्यायालयाने हा अंतिम निकाल दिला. मात्र, शिक्षा सुनावल्यानंतर चारही आरोपींना जामीन मंजूर करण्यात आला असून, निकालाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे.उरणमधील एका मुलीची छेड काढल्याच्या प्रकरणावरून संबंधित तरुणाला जाब विचारण्यासाठी आ. महेश बालदी आणि अन्य काही जण गेले होते. त्यावेळी त्या तरुणाला गंभीर मारहाण करण्यात आली तसेच शिवीगाळ करण्यात आल्याचा आरोप होता. या प्रकरणी दाखल खटला अलिबाग येथील मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात सुरू होता.

या खटल्याचा अंतिम निकाल सुनावत न्यायालयाने आ. बालदी यांच्यासह चारही आरोपींना तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. त्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. अपीलासाठी मुदत मिळाल्यानंतर आमदार बालदी उरणकडे रवाना झाले.

इम्तियाज जलील यांना जामीन टीसीएस धर्मांतर व महिला छळ प्रकरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : नाशिकमधील टीसीएस कंपनीतील कथित महिला अत्याचार, छळ आणि धर्मांतर प्रकरणात एमआयएमचे नेते तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांना म ोठा दिलासा मिळाला आहे. नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने गुरुवारी (दि. १९ नोव्हेंबर) त्यांना ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.



टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याच्या आरोपावरून नाशिक पोलिसांनी इम्तियाज जलील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाच्या तपासादरम्यान दाखल करण्यात आलेल्या पुरवणी आरोपपत्रात त्यांचा सहआरोपी म्हणून समावेश करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणाच्या सुनावणीसाठी इम्तियाज जलील गुरुवारी न्यायालयात हजर झाले होते.

त्यांच्या जामीन अर्जावर जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली. जवळपास अडीच तास चाललेल्या या कामकाजानंतर न्यायालयाने ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्याचा निर्णय दिला. या निर्णयामुळे बहुचर्चित टीसीएस प्रकरणात इम्तियाज जलील यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

'जागतिक राजकारणात भारत दुय्यम खेळाडू'

शिकागो विद्यापीठातील राहुल गांधींची टीका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतील शिकागो विद्यापीठात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारताच्या परराष्ट्र धोरणासह देशांतर्गत राजकारण आणि निवडणूक प्रक्रियेवर केलेल्या विधानांमुळे देशातील राजकीय वातावरण तापले आहे. जागतिक राजकारणात भारताची भूमिका दुय्यम झाली असून, अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चेत पाकिस्तान मध्यस्थी करत असताना भारत केवळ बघ्याच्या भूमिकेत असल्याची टीका त्यांनी केली. राहुल गांधी यांच्या या विधानांवर भाजपाने आक्षेप घेत, परदेशी भूमीवर जाऊन देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.



शिकागो विद्यापीठातील संवादादरम्यान राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणावरही प्रश्न उपस्थित केले. जागतिक नेत्यांशी असलेल्या वैयक्तिक मैत्रीपेक्षा देशाचे राष्ट्रीय हित महत्त्वाचे असते.

■ पाकिस्तानशी संवादाबाबत बोलताना दहशतवाद थांबल्याशिवाय चर्चा शक्य नसल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. इस्रायल–हमास संघर्ष, गाझामधील कारवाई आणि इस्रायलवरील हल्ल्याबाबतही त्यांनी भूमिका मांडली.

त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण हे इतर देशांच्या नेत्यांशी असलेल्या संबंधांवर नव्हे, तर भारताच्या हितावर आधारित असावे, असे ते म्हणाले. स्वातंत्र्यानंतर अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या भारताने पुन्हा जागतिक राजकारणात प्रभावी भूमिका बजावण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आर्थिक व राजकीय सत्तेच्या एकत्रीकरणाचा आरोप करताना अदानी समूहाचा संदर्भ दिला. विद्यापीठे आणि महत्त्वाच्या संस्थांम ध्ये विशिष्ट विचारसरणीच्या लोकांच्या नियुक्त्या होत असल्याचा दावाही त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत तरुणांच्या आंदोलनालाही त्यांनी पाठिंबा दर्शविला.

राहुल गांधी यांच्या विधानांवर केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी प्रत्युत्तर दिले. भारतात राहून सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्य असताना परदेशात जाऊन देशात लोकशाही आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य नसल्याचे सांगणे विसंगत असल्याचे ते म्हणाले.

राहुल गांधी यांची विधाने खोटी व आक्षेपार्ह असल्याचा आरोप करत, देशविरोधी शक्तींच्या प्रभावाखाली ते बोलत आहेत का, असा सवालही रिजिजू यांनी उपस्थित केला.

परराष्ट्र धोरणापासून निवडणूक प्रक्रियेपर्यंत अनेक मुद्द्यांवर राहुल गांधी यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि भाजपाने केलेला पलटवार यामुळे आता या विधानांचे राजकीय पडसाद देशभर उमटू लागले आहेत.

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० वर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने उपाययोजनांना वेग दिला आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०४ वरून ३१० झाली असून, रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी ४८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दुष्काळाच्या काळात कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

पाणीपुरवठा योजनांसाठी ४८८ कोटी

दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत नव्याने सहा तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर आमदार शिवाजी पाटील, अशोकराव माने आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पाठपुराव्यामुळे गडहिंग्लज तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. त्यामुळे राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या आता ३१० झाली आहे.

दरम्यान, आणखी १३ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याच्या मागण्या शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या तालुक्यांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जवसुलीच्या नावाखाली त्रास देणे सहन केले जाणार नाही. बँका किंवा मायक्रो फायनान्स कंपन्यांनी कर्जाच्या परतफेडीसाठी तगादा लावल्यास संबंधित शेतकऱ्यांनी दबावाखाली येऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. अशा प्रकारचा त्रास होत असल्यास पोलीस, जिल्हाधिकारी किंवा लोकप्रतिनिधींकडे तक्रार करावी. संबंधित संस्थांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहनही महसूलमंत्र्यांनी केले. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यावर शासनाचा भर आहे. त्यासाठी ४८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामांना गती देण्याच्या दृष्टीने प्रशासनाला कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्र्यांवर आरोप केल्यास गप्प बसणार नाही : डॉ सुजय विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अजित पवार यांच्या विमान अपघातावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आम दार रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांना भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अपघाताच्या तपासाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करण्यामागचे कारण काय? कुटुंबीयांनीच प्रश्न उपस्थित केलेले नसताना रोहित पवार एवढे पुढे का? आणि सीबीआयवर अचानक विश्वास कसा निर्माण झाला? असे एकापाठोपाठ तीन सवाल उपस्थित करत विखे पाटील यांनी रोहित पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर माध्यमांशी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी रोहित पवारांच्या आरोपांना उत्तर दिले. अजित पवार यांच्या निधनाचे राजकारण होऊ नये, ही आम ची भूमिका होती. अजितदादा हे आमचे नेते होते आणि त्यांच्याबद्दल आम्हाला मनापासून आदर आहे. मात्र, या संवेदनशील प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव विनाकारण गोवण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याला उत्तर देणारच, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुसरा सवाल उपस्थित करताना विखे म्हणाले की, सहा महिन्यांपूर्वी ईडीच्या कारवाईच्या वेळी केंद्र सरकारच्या तपास यंत्रणांवर अविश्वास व्यक्त केला जात होता. मग आता सीआयडीऐवजी सीबीआय तपासाची मागणी का केली जात आहे? सीबीआयवर अचानक विश्वास कसा निर्माण झाला? तपास यंत्रणांबाबतची भूमिका बदलण्याम ागचे नेमके कारण काय, असा सवाल त्यांनी केला.



तिसऱ्या सवालात त्यांनी व्हीएसआर कंपनीचा मुद्दा उपस्थित केला. व्हीएसआर कंपनीच्या मालकासोबत मुख्यमंत्र्यांचे छायाचित्र दाखवून संबंध असल्याचे सूचित केले जात असेल, तर रोहित पवार यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचे छायाचित्र दाखवून त्यांच्याबाबतही असेच प्रश्न उपस्थित करता येतील का? जर केवळ फोटोंचा आधार लावायचा असेल, तर ज्या पंतप्रधानांसोबत तुमचे फोटो आहेत आणि ज्या अदानींवर राहुल गांधी सातत्याने आरोप करतात त्यांची गाडी चालवताना तुम्ही दिसता; त्याचे उत्तर तुम्ही देणार का? असे अनेक फोटो आम्हीही दाखवू शकतो असा प्रतिप्रश्न विखे यांनी उपस्थित केला.

अपघाताच्या तपासाबाबत कोणतीही शंका असल्यास निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे. आवश्यक पुरावे, व्हिडिओ आणि संबंधित माहिती समोर आली पाहिजे. मात्र, चौकशीच्या नावाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनाकारण लक्ष्य करणे योग्य नाही. यापुढे मुख्यमंत्र्यांवर अशा प्रकारचे आरोप झाले, तर पक्ष म्हणून आणि वैयक्तिक पातळीवरही ठाम भूमिका मांडली जाईल, असा स्पष्ट इशाराही डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिला.

■ डॉ. सुजय विखे पाटील यांनी रोहित पवारांच्या भूमिकेवर तीन महत्त्वाचे सवाल उपस्थित केले. ते म्हणाले, अजित पवार यांच्या अपघाताबाबत किंवा घातपाताच्या संशयाबाबत सर्वप्रथम त्यांच्या कुटुंबीयांनी भूमिका मांडणे अपेक्षित आहे. शरद पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांनी या प्रकरणात प्रश्न उपस्थित केले, तर त्यावर चर्चा होऊ शकते. मात्र, कुटुंबीयांनीच प्रश्न उपस्थित केलेले नसताना रोहित पवार यांनी पुढाकार घेऊन मुख्यमंत्र्यांवर आरोप करण्याचे कारण काय?

अपघाताशी संबंधित काही पुरावे किंवा शंका असतील, तर त्यासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणे, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दाद मागणे आणि त्यानंतर न्यायालयात जाणे, असे पर्याय आहेत. मात्र, केवळ माध्यमांसमोर आरोप करून कोणावरही निष्कर्ष लादता येणार नाहीत. माध्यमे ही जनतेपर्यंत माहिती पोहोचविण्याचे माध्यम आहेत; ती न्यायाधीश नाहीत, असेही विखे पाटील यांनी ठणकावून सांगितले.अजित पवार यांच्या विमान अपघाताची निष्पक्ष चौकशी व्हावी, याला आमचाविरोध नाही. मात्र, तपासाच्या नावाखाली राजकीय आरोप-प्रत्यारोप करणे आणि पुराव्यांशिवाय मुख्यमंत्र्यांना या प्रकरणात ओढणे योग्य नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडत डॉ. सुजय विखे पाटील यांनी रोहित पवारांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.

पवना धरणग्रस्तांना चार एकरांपर्यंत पर्यायी जमीन मिळणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : गेल्या सहा दशकांपासून प्रलंबित असलेल्या पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पवना धरणग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करताना संपादित झालेल्या क्षेत्राइतकी जमीन देण्यात येणार असून, एका प्रकल्पग्रस्ताला जास्तीत जास्त चार एकर जमीन मिळणार आहे. उपलब्ध जमिनीची प्रत्यक्ष पाहणी करून पुनर्वसन प्रक्रिया गतिमान करण्यासाठी समिती गठित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

सहा दशकांपासून प्रलंबित पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी

यासंदर्भात मंत्रालयात झालेल्या बैठकीत बावनकुळे यांनी पुनर्वसनाच्या विविध प्रश्नांचा आढावा घेतला. पर्यायी जमीन वाटप करताना प्रत्येक प्रकल्पग्रस्ताच्या मूळ संपादित जमिनीचे क्षेत्र विचारात घेतले जाणार आहे. त्यानुसार तेवढ्याच क्षेत्राची पर्यायी जमीन देण्यात येईल. मात्र, ही मर्यादा कमाल चार एकर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जमीन वाटपाची प्रक्रिया पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ होण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे सक्षम अधिकारी आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांची समिती गठित करण्यात येणार आहे. ही समिती प्रत्यक्ष जागेवर जाऊन उपलब्ध जमिनीची पाहणी करणार असून, जमिनीचे क्षेत्रफळ, सद्यस्थिती आणि वाटपाची व्यवहार्यता तपासणार आहे. पुनर्वसनासाठी आवश्यक जमिनीच्या मोजणीचा खर्च जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) माध्यमातून उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे मोजणीचा आर्थिक भार प्रकल्पग्रस्तांवर पडणार नाही.

पवना धरणामुळे बाधित झालेल्या २२ गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविताना पुनर्वसित गावांच्या विकासालाही प्राधान्य दिले जाणार आहे. गावठाणांचा विस्तार वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असून, नागरी सुविधांचा आराखडाही तयार केला जाणार आहे.

यापूर्वी तयार करण्यात आलेल्या भूखंड नियोजन आराखड्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. स्थानिक परिस्थिती आणि उपलब्ध जमिनीचा विचार करून आराखड्यात बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार आहेत. धरणग्रस्तांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला विधी व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंडळाचे कार्यकारी संचालक संजीव चोपडे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी स्वप्नील मोरे तसेच पवना धरणग्रस्त संयुक्त संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अभिनेता सैफ अली खानला जीवे मारण्याची धमकी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची चर्चा सध्या मनोरंजन क्षेत्रात सुरू आहे. या धमकीशी संबंधित असल्याचा दावा करण्यात येणारी एक कथित ध्वनिमुद्रिका समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. त्यामुळे सैफ अली खानच्या सुरक्षेबाबत चाहत्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.



प्रसारित होत असलेल्या या ध्वनिमुद्रिकेत सैफ अली खानला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या ध्वनिमुद्रिकेची सत्यता अद्याप स्पष्ट झालेली नाही. तसेच या कथित धमकीबाबत सैफ अली खान किंवा त्याच्या कुटुंबीयांकडून अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. पोलिसांकडूनही या प्रकरणाची अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

समाजमाध्यमांवर व्हायरल होणाऱ्या या ध्वनिमुद्रिकेमुळे चर्चेला उधाण आले असले, तरी अधिकृत दुजोरा मिळेपर्यंत या वृत्ताबाबत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.

सात दिवसांचे उपोषण अखेर स्थगित
तीन बंधारे भरण्याचे जलसंपदामंत्र्यांचे आश्वासन

आ. रमेश बोरनारे, ॲड. अजित काळे यांच्या मध्यस्थीने तोडगा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : गोदावरी नदीवरील वैजापूर व श्रीरामपूर तालुक्याच्या लाभक्षेत्रातील वांजरगाव, खानापूर आणि कमालपूर हे तीन केटीवेअर बंधारे पिण्याच्या पाण्यासाठी किमान ५० टक्के भरून द्यावेत, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी संघटनेचे वैजापूर तालुकाध्यक्ष गणेश तांबे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेले सात दिवसांचे उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानंतर बुधवारी (दि. १८) रात्री उशिरा आमदार रमेश बोरनारे आणि ॲड. अजित काळे यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी हिंदवी जनक्रांती सेनेचे अध्यक्ष अजय साळुंके व बाळासाहेब जानराव उपस्थित होते.



गोदावरी नदीवरील वांजरगाव, खानापूर आणि कमालपूर हे तीन बंधारे पिण्याच्या पाण्यासाठी किमान ५० टक्के भरून द्यावेत, या मागणीसाठी ११ नोव्हेंबरपासून नागमठाण पुलावर दहा उपोषणकर्त्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. सात दिवस उलटूनही मागणीवर तोडगा न निघाल्याने उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे आणि शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी उपोषणस्थळी तळ ठोकून जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधला. तीन बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याबाबत मंत्र्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या चर्चेदरम्यान एक्स्प्रेस कालव्यातून तीनही बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याच्या पर्यायावर विचारविनिमय झाला. त्यानंतर आमदार बोरनारे व ॲड. काळे यांनी डागपिंपळगाव, नांदी, सटाणा आणि म्हस्की आदी ठिकाणांहून गोदावरी नदीला मिळणाऱ्या ओढ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीनंतर उपोषणस्थळी परतून जलसंपदामंत्र्यांशी पुन्हा चर्चा करण्यात आली.

अंतिम चर्चेत एक्स्प्रेस कालव्याचे नियमित आवर्तन पूर्ण झाल्यानंतर तीनही बंधाऱ्यांसाठी पाणी सोडण्याबाबत सहमती झाली. यावेळी उपोषणकर्ते गणेश तांबे यांनी शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यातून कपात करून आम्हाला पाणी नको. कालव्याचे नियमित आवर्तन पूर्ण झाल्यानंतर बंधारे भरण्यासाठी स्वतंत्र पाणी द्यावे. बंधारे भरण्यासाठी आवश्यक असलेले पाणी निश्चित करून त्यानुसार पाणी सोडण्यात यावे, अशी भूमिका मांडली. त्यानंतर **(पान ४ वर)**

१२० एमसीएफटी पाणी नेमके गेले कुठे? दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

गोदावरी नदीवरील बंधारे भरण्यासाठी सप्टेंबर महिन्यात नांदूर-मध्यमेश्वरमधून १२० एमसीएफटी पाणी सोडण्यात आले होते. मात्र, कोपरगाव आणि राहाता तालुक्यातील केटीवेअर बंधाऱ्यांमधून पुढे वैजापूर व श्रीरामपूर तालुक्यांपर्यंत हे पाणी पोहोचलेच नाही. त्यामुळे वांजरगाव, खानापूर आणि कमालपूरसह खालील बंधारे कोरडे राहिले. परिणामी, शेतकऱ्यांवर उपोषणाचे आंदोलन करण्याची वेळ आली. या पाण्याचे नियोजन आणि प्रत्यक्ष वितरण यांची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच पाणी पोहोचविण्यात हलगर्जी करणाऱ्या नाशिक जलसंपदा विभागातील दोषी उपअभियंत्यांवर कारवाई करावी, अशी मागणी गणेश तांबे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

प्रा. रुपाली कोते राष्ट्रीय स्तरावर अव्वल, अन्य चार शिक्षकांचीही उत्कृष्ट कामगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



प्रवरानगर : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणी येथील प्राध्यापिका प्रा. रुपाली बाळासाहेब कोते यांनी राष्ट्रीय तंत्रज्ञान-सक्षम प्रगत शिक्षण कार्यक्रमाच्या (एनपीटीईएल) ऑनलाइन अभ्यासक्रम परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशभरातील ८,७६६ सहभागींपैकी अव्वल १ टक्के गुणवंतांमध्ये स्थान मिळवत त्यांनी तब्बल ९७ टक्के गुण प्राप्त केले. अशी माहिती प्राचार्य डॉ.रविंद्र जाधव यांनी दिली.

एनपीटीईएलच्या 'अन्न आणि पोषणशास्त्राची मूलतत्त्वे' या आठ आठवड्यांच्या आणि तीन श्रेयांकांच्या ऑनलाइन अभ्यासक्रमात प्रा. कोते यांनी हे यश मिळविले. अध्यापनाची जबाबदारी सांभाळतानाच ज्ञानवृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची त्यांची जिद्द, अभ्यासातील सातत्य आणि नवीन ज्ञान आत्मसात करण्याची तळमळ यामुळे हे उल्लेखनीय यश मिळाले आहे. राष्ट्रीय स्तरावरील हजारो सहभागींतून अव्वल १ टक्क्यांत स्थान मिळविणे ही त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची विशेष दखल मानली जात आहे. याच अभ्यासक्रमात महाविद्यालयातील डॉ. गणेश शशिकांत शिंदे, प्रा. शुभम जगन्नाथ खुळे, प्रा. चैताली गजानन भवर आणि प्रा. सुनील पोपट कडनर यांनीही यश संपादन केले. अध्यापनासोबतच ज्ञान व कौशल्यवृद्धीसाठी शिक्षकांनी घेतलेला पुढाकार महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीला बळकटी देणारा ठरला आहे.

चिप्सच्या युद्धात महासत्तांची कसोटी!

एनव्हिडियाचे वर्चस्व, अमेरिकेचे निर्बंध आणि चीनची महत्त्वाकांक्षा; कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानावर नियंत्रण मिळविण्याची जागतिक लढाई!

==========

कधीकाळी जगाचे सामर्थ्य तेलाच्या साठ्यांवर, पोलादाच्या उत्पादनावर आणि लष्करी ताकदीवर मोजले जात होते. आता हे चित्र बदलले आहे. भविष्यात जगावर कोणाचे वर्चस्व असेल, हे ठरविण्यात अत्याधुनिक सेमीकंडक्टर चिप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता निर्णायक ठरणार आहेत. ज्याच्या हाती प्रगत चिप्सचे तंत्रज्ञान, त्याच्या हाती अर्थव्यवस्था, संरक्षण आणि जागतिक राजकारणाच्या सत्तेच्या चाव्या असतील. त्यामुळे अमेरिकेची 'एनव्हिडिया' आणि चीन यांच्यातील तंत्रज्ञान संघर्ष हा केवळ व्यापाराचा विषय नाही, तर भविष्यातील जागतिक महासत्तेच्या नेतृत्वाची लढाई आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात आज 'एनव्हिडिया'ने निर्माण केलेले वर्चस्व थक्क करणारे आहे. व्हिडीओ गेमसाठी ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट (जीपीयू) तयार करणारी कंपनी म्हणून सुरुवात झालेल्या या कंपनीने काळाची पावले ओळखली. जीपीयूचा उपयोग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रचंड गणनांसाठी होऊ शकतो, हे ओळखून कंपनीने अत्याधुनिक चिप्स विकसित केल्या. आज जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांना एआय मॉडेल विकसित करण्यासाठी आणि प्रशिक्षित करण्यासाठी एनव्हिडियाच्या चिप्सची गरज भासते. अत्याधुनिक एआय चिप्सच्या बाजारपेठेत कंपनीचा मोठा हिस्सा असल्याने तिचे महत्त्व केवळ व्यावसायिक राहिलेले नाही. एका खासगी कंपनीचे वर्चस्व जागतिक तंत्रज्ञान व्यवस्थेवर प्रभाव टाकू लागले आहे, ही बाबच चिंताजनक आहे.



अमेरिकेला या सामर्थ्याची जाणीव आहे. म्हणूनच चीनच्या तंत्रज्ञान विकासाला मर्यादा घालण्यासाठी २०२२ पासून अमेरिकेने एनव्हिडियाच्या प्रगत चिप्सच्या निर्यातीवर निर्बंध आणण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय सुरक्षा हे त्यामागचे कारण सांगितले जाते. कारण या चिप्सचा वापर केवळ उद्योग आणि संशोधनापुरता मर्यादित नाही. लष्करी संशोधन, स्वयंचलित शस्त्रप्रणाली, गुप्तचर यंत्रणा आणि सायबर युद्धातही त्यांचा उपयोग होऊ शकतो. चीनच्या हाती हे तंत्रज्ञान पडू नये, ही अमेरिकेची भूमिका आहे. परंतु प्रश्न असा आहे की, जागतिक बाजारपेठेत व्यापार करणाऱ्या कंपन्यांना राजकीय आणि सामरिक संघर्षाच्या चौकटीत किती काळ बांधून ठेवता येणार?

निर्बंध घालणे सोपे असते; त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे मात्र कठीण असते. आधुनिक उत्पादन साखळी अनेक देशांत विभागलेली आहे. सिंगापूर आणि मलेशियासारख्या देशांमार्फत चीनमध्ये चिप्स पोहोचत असल्याचे दावे याच व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करतात. म्हणजेच अमेरिकेने निर्बंध लादले, तरी जागतिक व्यापाराचे मार्ग पूर्णपणे बंद झालेले नाहीत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, तंत्रज्ञानाच्या व्यापारात केवळ उत्पादकावर निर्बंध लादून चालणार नाही, तर संपूर्ण पुरवठा साखळीवर नियंत्रण ठेवावे लागेल. कंपन्यांनीही नफ्याच्या हव्यासापोटी राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड करता कामा नये.

मात्र येथे अमेरिकेच्या भूमिकेतील दुटप्पीपणाचाही विचार करावा लागेल. एका बाजूला चीनला चिप्स विकण्यास निर्बंध आणि दुसऱ्या बाजूला अमेरिकन कंपन्यांचे जागतिक बाजारपेठेतील वर्चस्व टिकविण्याची धडपड, हा विरोधाभास आहे. एनव्हिडियाचे प्रमुख जेनसन हुआंग यांनीही निर्बंध शिथिल करण्याची भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. चीनसारखी मोठी बाजारपेठ पूर्णपणे सोडल्यास तेथील स्थानिक कंपन्यांना स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्याची संधी मिळेल, असा व्यावसायिक युक्तिवाद केला जातो. पण कंपनीचा नफा आणि देशाची सुरक्षा या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यांची गल्लत झाली तर त्याची किंमत भविष्यात संपूर्ण जगाला मोजावी लागू शकते.

एनव्हिडियाभोवती निर्माण झालेली संशयाची परिस्थिती, कंपनीच्या अंतर्गत सुरक्षेबाबतचे आरोप आणि कथित परदेशी हस्तक्षेपाचे मुद्देही गंभीर आहेत. कोणत्याही आरोपाची पुराव्यांनिशी चौकशी झाली पाहिजे. मात्र संवेदनशील तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या कंपन्यांच्या माहितीची सुरक्षा किती सक्षम आहे, हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. संशोधन, उत्पादनांचे आराखडे, ग्राहकांची माहिती आणि भविष्यातील व्यावसायिक धोरणे ही राष्ट्रीय सामर्थ्याशी संबंधित संपत्ती आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा, कर्मचारी पडताळणी आणि परदेशी भागीदारी याबाबत कठोर व्यवस्था असणे अपरिहार्य आहे.

दुसरीकडे, एआय क्षेत्रातील आर्थिक गुंतवणुकीचे वाढते जाळेही चिंतेचा विषय आहे. एका कंपनीने दुसऱ्या कंपनीत गुंतवणूक करायची, त्या गुंतवणुकीतून पुन्हा स्वतःच्या उत्पादनांची मागणी निर्माण व्हायची, अशा परस्परावलंबी आर्थिक व्यवहारांना 'सर्क्युलर फायनान्सिंग' म्हटले जाते. या व्यवस्थेत एखाद्या प्रमुख कंपनीच्या आर्थिक स्थितीला धक्का बसल्यास त्याचे पडसाद अनेक कंपन्यांमध्ये उमटू शकतात. त्यातच डेटा सेंटरसाठी लागणारी प्रचंड गुंतवणूक, वीज आणि पाण्याची गरज तसेच गुंतवणुकीवरील परताव्याची अनिश्चितता ही आव्हाने आहेत. त्यामुळे एआय क्षेत्रातील तेजी ही कायमस्वरूपी असेल, असे गृहीत धरणे धोकादायक ठरेल.

या संपूर्ण संघर्षात भारताने केवळ प्रेक्षकाची भूमिका घेऊन चालणार नाही. चीनबाहेर पर्यायी उत्पादन केंद्रे शोधणाऱ्या जागतिक कंपन्यांसाठी भारताकडे मोठी संधी आहे. मात्र केवळ परदेशी कंपन्यांना निमंत्रणे देऊन सेमीकंडक्टर महासत्ता होता येणार नाही. संशोधन, कुशल मनुष्यबळ, चिप डिझाइन, अखंड वीजपुरवठा, पाणी आणि आधुनिक पायाभूत सुविधांची उभारणी करावी लागेल. भारताकडे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठी मनुष्यबळ क्षमता आहे. तिचा उपयोग करून चिप डिझाइन आणि एआय संशोधनात स्वदेशी नेतृत्व निर्माण करण्याची हीच योग्य वेळ आहे.

अशोकनगर पोलीस चौकी पूर्ववत सुरू करा; अन्यथा आंदोलन छेडणार!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर: निपाणीवडगाव-अशोकनगर परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून गुन्हेगारी प्रवृत्तीने डोके वर काढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशोकनगर येथील बंद असलेली पोलीस चौकी तातडीने पूर्ववत सुरू करून परिसरात नियमित पोलीस गस्त सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निपाणी वडगाव जनहित संघर्ष समितीने दिला आहे. याबाबत अप्पर पोलीस अधीक्षक आणि श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांना निवेदन देण्यात आले.

निपाणी वडगाव-अशोकनगर हा श्रीरामपूर तालुक्यातील लोकसंख्येने मोठा तसेच शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचा परिसर आहे. येथे शाळा, महाविद्यालये, बाजारपेठ आणि अशोक उद्योग समूहामुळे नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, गेल्या पाच ते सहा वर्षांपासून येथील अधिकृत पोलीस चौकी बंद अवस्थेत आहे. पोलिसांसाठी हरेगाव फाटा येथे निवारा केंद्र सुरू करण्यात आल्याने अशोकनगर परिसरातील सुरक्षा व्यवस्था कमकुवत झाल्याचा आरोप समितीने केला आहे.

परिसरातील वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून शाळा-महाविद्यालयांमध्ये येणाऱ्या महिला व मुलींच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अशोकनगर



पोलीस चौकी पूर्ववत सुरू करावी, नियमित पोलीस कर्मचारी नियुक्त करावेत, रात्रीची गस्त वाढवावी, चोरीच्या घटनांचा तपास करून आरोपींना अटक करावी आणि शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विशेष बंदोबस्त ठेवावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र गोडगे व ठाणे अंमलदार टेकाळे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशारा समितीने दिला आहे.

मृतदेहाच्या अंत्यविधीसाठीही स्वर्गरथाला चालक नाही

देवळाली प्रवरा नगरपालिकेचा कारभार चव्हाट्यावर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : देवळाली प्रवरा शहरातील प्रकाश देशमुख या नागरिकाचा राहुरी फॅक्टरी येथे विद्युत रोहित्र (डीपी) बदलण्याच्या कामादरम्यान विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. शवविच्छेदनानंतर मृतदेह अंत्यविधीसाठी देवळाली प्रवरा अमरधाम येथे आणायचा असताना नगरपालिकेच्या स्वर्गरथासाठी चालकच उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. माणसाच्या शेवटच्या प्रवासासाठीही नगरपालिका व्यवस्था करू शकत नसेल, तर शहराच्या विकासाच्या गप्पा कशासाठी? असा संतप्त सवाल काँग्रेसचे नगरसेवक दासू उर्फ तुकाराम पठारे यांनी उपस्थित केला आहे.प्रकाश देशमुख मयत व्यक्ती देवळाली प्रवरा येथील रहिवासी असल्याने शवविच्छेदनानंतर अंत्यविधीसाठी मृतदेह घेऊन जाण्याकरिता स्वर्गरथाची आवश्यकता होती. यासाठी नगरसेवक पठारे यांनी नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधला. मात्र, स्वर्गरथ उपलब्ध असला तरी तो चालविण्यासाठी चालक नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. यावर संतप्त होत पठारे यांनी, विरोधी नगरसेवकाने संपर्क साधल्यानंतरच पालिकेकडे चालक नसल्याचे सांगितले जाते का? नागरिकांच्या अंत्यविधीसाठी स्वर्गरथ चालविण्याची व्यवस्था पालिकेकडे असू नये, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, अशी नाराजी व्यक्त केली. जिवंतपणी मूलभूत सुविधा नाहीत आणि मृत्यूनंतर अंत्यविधीसाठीही व्यवस्था नाही, तर नगरपालिका नेमकी कोणासाठी चालवली जात आहे? असा सवाल त्यांनी केला. शहरातील नागरिकांना साधी अंत्यविधीची सुविधाही उपलब्ध करून देता येत नसेल, तर सत्ताधाऱ्यांनी विकासाची भाषा करू नये. नागरिकांना मूलभूत सेवा देण्याची जबाबदारी पार पाडता येत नसेल, तर अशा सत्ताधाऱ्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार काय? असा घणाघाती प्रश्न नगरसेवक दासू उर्फ तुकाराम पठारे यांनी उपस्थित केला. नागरिकांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या प्रवासात नगरपालिका सोबत असणे अपेक्षित असताना, शेवटच्या प्रवासातही स्वर्गरथाला चालक मिळत नसेल, तर पालिकेच्या कारभाराचा हा कोणता विकास? अशी चर्चा आता शहरात सुरू झाली आहे.

क्रीडा ग्राउंडवर पोलीस व शासकीय सैन्य भरतीसाठी १०० मीटर धावपट्टीचे उद्घाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान: येथील कारेगाव रोड लागत असलेल्या क्रीडा ग्राउंड वर अग्नीवीर व पोलीस व इतर शासकीय सैन्य दलातील भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी त्या क्रीडा मैदानावर १०० मीटरची धावपट्टी संकल्प अभिनव भारत फाउंडेशन यांच्या सहकार्यातून तयार करण्यात आली असून नुकतेच तिचे उद्घाटन भाजप जिल्हा उद्योग आघाडीचे अध्यक्ष अनिल बोडखे व पत्रकार अर्जुन राऊत त्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे शाखाध्यक्ष सुजित बोडखे, प्रकाश गाडेकर, व संकल्प अभिनव भारत फाउंडेशनचे पदाधिकारी ,भरतीपूर्व प्रशिक्षणार्थी तरुण युवक, खेळाडू उपस्थित होते.

टाकळीभान गावाचे नाव येथील उत्कृष्ट कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंमुळे देश व विदेशात पोहोचले असून क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीमुळे पोलीस व सैन्य दल व इतर शासकीय क्षेत्रामध्ये टाकळीभानचे १०० च्या वर तरुण युवक भरती झालेले आहेत. त्यासाठी येथील तरुण युवकांचे खेळाविषयी असणारे निस्सिम प्रेम, भरतीसाठी मैदानावर घेतली जाणारी कसरत, प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न, सातत्य, थोर जेष्ठ खेळाडूंचे मार्गदर्शन त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना यशापर्यंत पोहोचण्यात मदत होत आहे. व वरिष्ठ, ज्येष्ठ खेळाडूंनी यशाची घालून दिलेली परंपरा त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत व त्यांचे यश डोळ्यासमोर ठेवून येथील तरुण युवक अहोरात्र कष्ट व मेहनत घेत आहेत. व यशस्वी होण्याची स्वप्ने बघत आहेत. याच धरतीवर संकल्प अभिनव भारत फाउंडेशन यांचे सहकार्य येथील तरुण युवक यांना भेटत आहे. त्यांचे येथील खेळाडू तरुण युवकांनी आभार व्यक्त केले आहेत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सदर फाउंडेशन चे आभार व्यक्त करून प्रशिक्षणार्थी तरुण युवकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

जर्शी गायींचे खोंड सांभाळणे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अशक्य :

अनुदानित संगोपनगृहे सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आधी : ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय बनला असला, तरी जर्शी गायींपासून जन्माला येणाऱ्या नर वासरांच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यांचा सांभाळ करणे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. परिणामी, काही पशुपालकांकडून वासरे रस्त्यावर बेवारस सोडून दिली जात असल्याचे चित्र आश्वी परिसरात दिसत आहे. शासनाने या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी अशोक पर्वत यांनी केली आहे. दुग्धव्यवसायात जर्शी गायींचे प्रमाण मोठे असून त्यांच्यापासून जन्माला येणाऱ्या नर वासरांच्या चारा-पाण्याचा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही. मोठे झाल्यानंतर या वासरांचा शेतीकामासाठी बैल म्हणूनही फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे त्यांचे संगोपन करायचे कसे, असा प्रश्न पशुपालकांसमोर निर्माण झाला आहे. पर्यायी व्यवस्था नसल्याने काही वासरे अडवळणाच्या रस्त्यांवर सोडून दिली जात आहेत. या वासरांना अन्न-पाण्याअभावी मृत्यूला सामोरे जावे लागत असून, त्यांचे मृतदेह उघड्यावर पडल्याने दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. मृत वासरांच्या मांसामुळे भटक्या कुत्र्यांचे कळप जमा होत असून, प्रवासी व विद्यार्थ्यांनाही कुत्र्यांच्या हल्ल्याचा धोका निर्माण झाला आहे, असे पर्वत यांनी सांगितले. या समस्येवर उपाय म्हणून शासनाने तालुका व गावपातळीवर अनुदानित वासरू संगोपनगृहे सुरू करावीत. तसेच गोशाळांना विशेषतः नर वासरांच्या चारा, पाणी आणि निवाऱ्यासाठी भरीव अनुदान द्यावे. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी होण्यासह गोवंशाचे संरक्षणही होईल, असे मत अशोक पर्वत यांनी व्यक्त केले.

प्रवरा मेडिकल कॉलेजमध्ये जागतिक रेडिओलॉजी दिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) येथे रेडिओ डायग्नोसिस विभागाच्या वतीने जागतिक रेडिओलॉजी दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेले शैक्षणिक मॉडेल प्रदर्शन आणि नृत्याविष्कार कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

लोणी येथील पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील व्याख्यानगृहात झालेल्या कार्यक्रमाच्या प्रारंभी एक्स-रेचा शोध लावणारे शास्त्रज्ञ विल्हेल्म कॉनराड रॉन्टजेन तसेच पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॉन्टजेन यांनी ८ नोव्हेंबर १८९५ रोजी एक्स-रेचा शोध लावला. त्यांच्या या संशोधनामुळे वैद्यकीय निदान क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडून आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रेडिओलॉजी विषयाशी संबंधित विविध शैक्षणिक मॉडेल्सचे प्रदर्शन मांडून आधुनिक निदान पद्धतींचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची दाद मिळवली.

समारोपप्रसंगी डॉ. आर. के. सिन्हा आणि विभागप्रमुख डॉ. योगेंद्र सचदेव यांच्या हस्ते उत्कृष्ट उपक्रम सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास विभागातील प्राध्यापक, कर्मचारी आणि बी.एस्सी. एमआरटीचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागातील सर्वांनी परिश्रम घेतले.

टेल टु हेड बंधारे भरून देण्याची दखल न घेतल्याने गोदाकाठच्या गावोगावी आंदोलने पेटली

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी महंत रामगिरी महाराज व गोदावरी नदीकाठच्या शेतकऱ्यांचे मागणीनुसार गोदावरी नदीवरील बंधारे भरण्यासाठी एक महिन्यापूर्वी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच १२० एमसी एफटी पाणी नांदुर मध्यमेश्वर मधुन सोडले असताना, नाशिक पाटबंधारे विभागाने त्यांच्या हद्दीतील बंधारे क्षमतेपेक्षाही वरचढ भरले.जलसंपदामंत्री मंत्री महोदयाचे आदेशाची सुरळीत अंमलबजावणी न करता हा प्रश्न हलक्यात घेतल्याने आज वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील नदीकाठच्या गावोगावी शेतकरी आक्रोश आंदोलने भडकलेली पाहावयास मिळत आहे.

जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशानुसार सोडण्यात आलेले १२० एमसी एफटी पाणी सोडल्यानंतर नाशिक जलसंपदा विभागाने निफाड, कोपरगांव राहता तालुक्यातील बंधाऱ्यावर जाऊन किमान अर्धे प्लेटा (फळ्या) स्वतः च्या निगरानीत काढने आवश्यक होते. नाऊर,वांजरगांव, खानापूर कमालपूर या बधाऱ्यापर्यत पाणी येणार असल्याने अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने नाऊर, खानापूर कमालपूर तर संभाजीनगर विभागाने वाज़रगांव बंधाऱ्याची डागडुजी करत ढापे फळ्यांची दुरूस्ती तातडीने केली होती. अखेरच्या कमालपुर बंधाऱ्यास नव्या प्लेटी ढापे बसविण्यात आले होते. अहिल्यानगर, संभाजीनगर पाटबंधारे विभागाचे अधिकारी कर्मचारी पाण्याचे स्वागतासाठी व बंधारे भरून घेण्यासाठी तैनात असताना, खाली नाऊर बंधाऱ्यात फक्त २५ टक्के पाणी येऊन आवर्तन श्रोत बंद झाला. खाली पाणीच न आल्याने पाटबंधारे अधिकारी कर्मचाऱ्यांसह शेतकऱ्यांची घोर निराशा झाली. दुसऱ्या दिवशी पाणी का? आले नाही म्हणून वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी वरती जाऊन सर्व बंधाऱ्याची पाहणी केली असता वरील सर्व बंधारे क्षमतेपेक्षाही वरचढ भरलेले होते.वरील एक एक दोन दोन प्लेटा काढण्याची विनंती शेतकऱ्यांना केली.परंतू चुक नाशिक विभागातील कोपरगांव राहता जलसंपदा विभागाची आहे.मात्र भांडण हाणामारी आपल्या शेतकऱ्यांत होईल म्हणून शेतकऱ्यांनी माघार घेतली.

नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सोनाली शहाणे , नांदुर मध्यमेश्वर पासून कोपरगाव पर्यंतचे बंधारे ज्याचे अखत्यारीत येतात ते कोपरगावचे डेप्युटी इंजिनिअर संदिप पाटील, पुणतांबा पासुन वरील पाच बंधारे ज्यांचे अखत्यारीत येतात ते राहता डेप्युटी इंजिनिअर विवेक लव्हाट यांना जाब विचारत धारेवर धरले. त्यावेळी त्यांनी लोकांनी चळवळ उभारून जलसंपदा विभागाला न जुमानता अगोदरच बंधारे पुर्ण क्षमतेने भरून घेतले असल्याचे अप्रत्यक्षरित्या उत्तर दिले. परंतु कोपरगाव,राहता तालुक्यातील स्थानिक लाभधारक शेतऱ्याकडून समजले की, आमच्या दोन्ही आमदारांनी कारखान्याची यंत्रणा दिमतीला देऊन ऊस पीके वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

हा वरील सर्व प्रकार घडल्यानंतर वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील आक्रमक शेतकऱ्यांनी चार दिवसातच गोदावरी नदीवरील नागमठान पुलावर वैजापूर शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष गणेश तांबे यांच्यासह सर्वपक्षीय शेतकऱ्यांनी आत्मदहन आंदोलन सुरू केले. कोरडे बंधाऱ्यातील शेतकरी आंदोलन पेटल्याने नाशिक जलसंपदा विभागांचे अधिकारी खडबडून जागे झाले. नाशिक जलसंपदा विभागाच्या अभियंता शहाणे यांनी सांगितले की मी कुंभमेळा आयोजनात गुंतल्याने येऊ शकत नाही. त्यावेळी राष्ट्रपती महोदयांचे कार्यक्रमाची तयारी सुरू होती. त्यामुळे कोपरगावचे पाटील व राहत्याचे लव्हाट हे दोघेही डेप्युटी इंजिनिअर आंदोलन स्थळी हजर झाले होते.अहिल्यानगर मधील श्रीरामपूर व संभाजीनगर विभागा मधील वैजापूर चे डेप्युटी इंजिनिअरही हजर होते. चर्चेत अनेकदा वरील सर्व बंधाऱ्याच्या दोन दोन प्लेटा ढापे काढण्याचा निर्णय झाला. मात्र कोपरगाव राहता राजकीय वरदहस्तापुढे नाशिक जलसंपदा विभाग कुठलीही अँक्शन घेऊ शकला नाही. आंदोलन थांबविण्यासाठी अखेर जलसंपदामंत्री यांनी भ्रमणध्वनीवर आंदोलन कर्त्याशी चर्चा केली.या चर्चेत मंत्रिमहोदयांनी सांगितले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या पाणी सोडण्याचे मुद्द्यावर मार्ग काढतो. पुढे आंदोलन मागे घेण्यासाठी आंदोलकांनी नाशिक जलसंपदा विभागाकडून लेखी पत्राची अट घातली. दुसऱ्या दिवशी महंत रामगिरी महाराज हे आंदोलन स्थळी पोहचले त्यांनी उपोषण कर्त्या शेतकऱ्यांना विनंती केली की आपण जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आश्वासन विनंतीवरून आंदोलन मागे घ्यावे. महंत रामगिरी महाराज यांच्या मध्यस्थीने अखेर शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांच्या उपस्थितीत आंदोलन स्थगित करण्यात आले.

यानंतर जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांना हे बंधारे भरून देण्याची तळमळ असताना. त्यांच्यापुढे अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीचे धर्मसंकट उभे राहिले. कारण या जिल्हा बँकेत राजकीय गटतट विसरून सर्वांना बरोबर घेऊन समझोता एक्स्प्रेस पुढे न्यायची होती.

राज्यात व महायुती सरकारमध्ये विखे परिवाराचे वर्चस्व सिद्ध करून दाखविणे हे जलसंपदामंत्री महोदयांचे एकमेव लक्ष्य असल्याने. कदाचित या बँक जुळवाजुळवी दरम्यान गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांच्या दोन दोन प्लेटा काढण्याचा निर्णय घेतला असता. तर कदाचित कोपरगांव तालुक्यातील नेते मंडळींची नाराजी ओढवून घेतली असती. म्हणून की काय? हा प्रश्न एक महिनाभर प्रलंबित राहिला अशी शंका आंदोलक शेतकऱ्यांनी उपस्थित केली आहे.आता बँक निवडणूक होऊन जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांचे स्वप्न साकार होऊन डॉ सुजय विखे पाटील चेअरमन झाले. मधल्या एक महिन्यात कोपरगाव तालुक्यातील बंधाऱ्यातून बरेच पाणी जिरले . एवढे करूनही वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील आंदोलक शेतकरी जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर नाराज नाहीत. महंत रामगिरी महाराज व आंदोलक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. की विखे पाटील च यातून मार्ग काढून जनावरे व माणसांना पिण्यासाठी बंधारे ५० टक्के निश्चित भरून देतील.



नोव्हेंबर मध्ये सोडलेल्या पाण्याची चौकशी करण्याची आंदोलक शेतकऱ्यांची मागणी

नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात नांदूर मध्यमेश्वर मधुन सोडलेल्या १२० एमसी एफटी पाण्याची जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी खातेनिहाय चौकशी करून अहवाल मागवावा अशी मागणी करत आंदोलनात अनुचित प्रकार घडल्यास वैयक्तिक सार्वजनिक वित्तीय हानी झाल्यास ज्या अधिकाऱ्यांचे अखत्यारीत बंधारे त्या नाशिक जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे अशी मागणी गावोगावच्या आंदोलक शेतकऱ्यांनी केली आहे.

भाऊसाहेब काळे

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

धिंगरी आळंबी, फुलांपासून रांगोळी बनविणे विषयी एक दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण

प्रवरानगर : ग्रामीण युवक-युवतींना कृषी उद्योजकतेच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे धिंगरी आळंबी आणि फुलांपासून रांगोळी बनविणे' या विषयावरील एक दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक गरजूंनी कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथे प्रत्यक्ष अथवा फोनद्वारे नोंदणी करण्याचे आवाहन अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली. प्रशिक्षणामध्ये आळींबी जाती,शेड उभारणी,तयार करण्याची पध्दत,स्पॉन तयार करणे,उत्पादन तंत्रज्ञान,मार्केटींग तर फुलांपासून रांगोळी तयार करण्यामध्ये फुलांची निवड,प्रक्रिया आणि तयार करण्याची पध्दत यांची माहीती दिली जाणार आहे. हे प्रशिक्षण केवळ ३० प्रशिक्षणार्थ्यांसाठी मर्यादित असल्याने इच्छुक व गरजू युवक-युवतींनी त्वरित कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा आवाहन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

बेलापूर येथे संताजी जगनाडे मंदिरात दीपोत्सव



बेलापूर : येथील श्रीसंत संताजी जगनाडे महाराजांच्या पावन मंदिरात पहिल्यांदाच येण्याचा मला मनस्वी आनंद. संतांच्या त्यागाचा व विचारांचा वारसा जपत प्रत्येकाने भारतमातेची सेवा करावी असे प्रतिपादन श्रीराम मंदिराचे महासचिव स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांनी केले. बेलापूर येथील संत संताजी जगनाडे महाराज मंदिरात स्वामी गोविंददेवगिरी यांचे उपस्थितीत दीपोत्सव तसेच फलक अनावरण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प.पू. स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज म्हणाले की, मी बेलापूरमधील आपल्या या श्री संत संताजी जगनाडे महाराज मंदिरामध्ये आज पहिल्यांदाच आलो असून, येथे येण्याचा मला मनस्वी आणि खूप आनंद होत आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची जगाचा उद्धार करणारी अभंगवाणी ज्यांनी स्वतः लिहून घेतली आणि ती चिरंतन (अमर) केली. महान संतांची सेवा करणे, त्यांची विचारसंपदा जपणे, ती टिकवून ठेवणे आणि त्यांची समर्पणाची वृत्ती समाजात रुजविणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

बेलापूर हनुमान मंदिरातील अन्नकोट उद्याऐवजी मंगळवारी होणार



बेलापूर : येथील प्रसिद्ध मेनरोड हनुमान मंदिरात उद्या (शनिवारी) आयोजित करण्यात आलेला अन्नकोट उत्सव कार्तिकी एकादशीमुळे स्थगित करण्यात आला आहे. आता हा उत्सव मंगळवार (दि. २४) रोजी सायंकाळी ७ वाजता संपन्न होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

बेलापूर येथील मेनरोडवरील हनुमान मंदिरात दरवर्षी अन्नकोट उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, उद्या कार्तिकी एकादशी असल्याने उत्सवाच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार मंगळवारी सायंकाळी ७ वाजता मंदिरात आरती होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

कोपरगावात सायना एन.सी. यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन

कोपरगाव : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या छायाचित्राची विटंबना केल्याच्या निषेधार्थ कोपरगाव शहर व तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने सायना एन.सी. यांच्या छायाचित्राला जोडे मारो आंदोलन करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

शिवसेना शहरप्रमुख गगन हाडा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात तालुकाप्रमुख श्रीरंग चांदगुडे, उपजिल्हाप्रमुख अस्लम शेख, संजय दंडवते, संपर्कप्रमुख मनोज कपोते, विधानसभा प्रमुख विवेक कुलकर्णी, युवासेना तालुकाप्रमुख विजय गोर्डे , बाळासाहेब मापारी, सुनील माकोने, विठ्ठल निकम, काना हाडा, नंदू निकम, निखिल क्रॅकाले, नानासाहेब निकम, हृषिकेश खैरनार, वरुण टाक, कुणाल चावरे, विनय टाक, मुन्ना मन्सुरी आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

संगमनेरला सात ठिकाणी अद्ययावत एस.टी बस प्रवासी थांबे उभारणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : संगमनेर तालुक्यातील एस.टी. बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी तालुक्यातील लोहारे, निळवंडे, मांची फाटा, वडगाव पान, धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द तसेच वरवंडी फाटा या सात ठिकाणी अद्ययावत प्रवासी मार्ग थांबे उभारण्यात येणार आहेत. या मागणीसाठी आमदार अमोल खताळ पाटील यांनी राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून संगमनेरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण ७५ प्रवासी मार्ग थांबे उभारणीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच नोकर दार वर्ग मोठ्या प्रमाणावर एस.टी. बसने प्रवास करतात. मात्र, अनेक बसथांब्यांवर पुरेशा सुविधा नसल्याने प्रवाशांना बसची प्रतीक्षा करताना उन वारा, पाऊस, यापासून संरक्षण व्हावे म्हणून ग्रामीण भागातील प्रवाशांचीलगैरसोय लक्षात घेऊन आमदार अमोल खताळ पाटील यांनी तालुक्यातील महत्त्वाच्या ठिकाणी अद्ययावत प्रवासी थांबे उभारण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार वरील बस थांबे मंजूर करण्यात आले आहे त्यामुळे वरील गावातील नागरिकांनी आ. अमोल खताळ यांचे आभार मानले.

कार्तिकी पौर्णिमा यात्रेची पुणतांब्यात जय्यत तयारी

एक लाख भाविक येण्याचा अंदाज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पुणतांबा : श्रीक्षेत्र पुणतांबा येथे कार्तिकी पौर्णिमेनिमित्त २३ नोव्हेंबर रोजी भरणाऱ्या यात्रेची जय्यत तयारी सुरू झाली आहे. गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या प्राचीन कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी यंदा सुमारे एक लाख भाविक येतील, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

पुणे आणि नाशिकनंतर पुणतांबा येथे कार्तिक स्वामींचे प्राचीन मंदिर असून, कार्तिकी पौर्णिमेला कृतिका नक्षत्राच्या पर्वकाळात कार्तिक स्वामींच्या मूर्तीचे दर्शन घेणे शुभ मानले जाते. या दिवशी महिलांना वर्षातून एकदाच कार्तिक स्वामींच्या मूर्तीचे दर्शन घेण्याची संधी मिळते. त्यामुळे या पर्वकाळात राज्याच्या विविध भागांतून महिला भाविकांसह मोठ्या संख्येने भाविक पुणतांब्यात दाखल होतात. या दर्शनाने मनोकामना पूर्ण होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

यंदा २३ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजून ४३ मिनिटांनी कार्तिकी पौर्णिमा सुरू होणार असून, मध्यरात्री २ वाजून २ मिनिटांनी कृतिका नक्षत्राचा पर्वकाळ सुरू होईल. हा पर्वकाळ २४ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजून २४ मिनिटांपर्यंत राहणार आहे.

यात्रेनिमित्त मंदिर परिसरातील मोकळ्या जागेत विविध वस्तूंची दुकाने थाटली जात असून, परिसराला यात्रेचे स्वरूप येणार आहे. मंदिराजवळ गोदावरी नदीत पाणी असल्याने भाविकांना गंगास्नानाचाही लाभ घेता येणार आहे. भाविकांना सुलभरीत्या दर्शन घेता यावे, यासाठी कार्तिक स्वामी आरती मंडळाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थिती असूनही यंदा यात्रेला मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

शिवमहापुराण कथेत नेवासा बुद्रुकच्या ग्रामस्थांना आरतीचा मान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगरचे उपमहापौर तथा नेवासा बुद्रुकचे भूमिपुत्र धनंजय कृष्णा भाऊ जाधव यांच्या पुढाकारातून अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या श्री शिवमहापुराण कथा सोहळ्यात नेवासा बुद्रुकच्या ग्रामस्थांना विशेष आरतीचा मान मिळाला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कथावक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून सुरू असलेल्या या कथासोहळ्यात श्री विश्वेश्वरनाथ बाबांच्या आरतीचे विमोचन आणि पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी महापौर ज्योती अमोल गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते, ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्यासह विविध नगरसेवक उपस्थित होते. उपमहापौर जाधव यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या विश्वेश्वरनाथ बाबांच्या आरतीचे गायन प्रसिद्ध गायक गिरीराज जाधव यांनी केले. त्यांच्या सुमधुर आवाजातील आरतीने उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. श्रीक्षेत्र देवगडचे ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज यांचे आशीर्वाद या सोहळ्याला लाभले. कथावक्ते समाधान महाराज शर्मा यांनी विश्वेश्वरनाथ बाबा आणि शिर्डीचे साईबाबा यांच्या धार्मिक व आध्यात्मिक महात्म्याचे विवेचन केले. नेवासा बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव, समाधान महाराज शर्मा, महापौर ज्योती गाडे, अमोल गाडे आणि गायक गिरीराज जाधव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वेश्वरनाथ बाबा संस्थानचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जायगुडे यांच्यासह ग्रामस्थ, मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपुत्राच्या पुढाकारातून गावच्या आराध्य दैवताला मिळालेला हा सन्मान नेवासा बुद्रुकच्या ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला.

हिंगणी बंधारा दुरुस्तीच्या कामाला वेग

१०० नवीन लोखंडी फळ्या दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोपरगाव : तालुक्यातील जलसंधारण आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या हिंगणी बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. आ. विवेक कोल्हे यांनी शासनदरबारी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, दुसऱ्या टप्प्यात बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी आणखी १०० नवीन लोखंडी फळ्या दाखल झाल्या आहेत. त्यामुळे बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाला गती मिळणार आहे.

कोपरगाव मतदारसंघातील विविध बंधाऱ्यांच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी आमदार कोल्हे यांच्या प्रयत्नांतून एकूण ७ कोटी २९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी १ कोटी १० लाख रुपये हिंगणी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी उपलब्ध झाले आहेत. या कामाच्या पहिल्या टप्प्यात ३५ नवीन लोखंडी फळ्या दाखल झाल्या होत्या. आता दुसऱ्या टप्प्यात आणखी १०० फळ्या उपलब्ध झाल्याने पाणी अडविण्याची यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या कामाला चालना मिळाली आहे.

माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून गोदावरी नदीवर उभारण्यात आलेला पहिला बंधारा म्हणून हिंगणी बंधाऱ्याला ऐतिहासिक आणि जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. या बंधाऱ्याची दुरुस्ती आणि संरचनात्मक मजबुतीकरण पूर्ण झाल्यानंतर पावसाळ्यातील वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा स्थानिक जलसाठा निर्माण करण्यासाठी अधिक प्रभावीपणे उपयोग करता येणार आहे.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे अत्यंत गरजेचे आहे. बंधाऱ्यांच्या दुरुस्तीमुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्याबरोबरच भूजल पातळी सुधारण्यास आणि परिसरातील जलस्रोत बळकट होण्यास मदत होणार आहे. मंजूर निधीतून इतर बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामेही टप्प्याटप्प्याने मार्गी लागणार आहेत.

हिंगणी बंधाऱ्याच्या या महत्त्वपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा विभाग आणि राज्य शासनाचे आभार मानले आहेत. जलसंधारणाच्या माध्यमातून पाणी जपूया, शेतीला बळ देऊया आणि कोपरगावच्या विकासाला गती देऊया, हा या कामामागील महत्त्वपूर्ण उद्देश आहे.

बीओटी बांधकामासह जागा व्यवहाराची एसआयटी चौकशी करा, राजेंद्र देवकर यांचे निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर पंचायत समिती परिसरातील बीओटी तत्त्वावरील बांधकाम तसेच जिल्हा परिषदेच्या मालकीच्या शासकीय जागांच्या व्यवहारात अनियमितता झाल्याचा आरोप शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र देवकर यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) निष्पक्ष व सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील हनुमान मंदिरासमोरील पूर्वीच्या धर्मशाळेची जागा तसेच जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांवर सुरू असलेल्या बीओटी बांधकामाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याचे देवकर यांनी निवेदनात म्हटले आहे. शासकीय जागांचे बाजारमूल्य, बीओटी करारनामे, निविदा प्रक्रिया, ठेकेदारांची निवड, बांधकामाच्या अटी व शासनाला मिळणारा आर्थिक मोबदला या सर्व बाबींची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. शासकीय मालमत्तेचा वापर करताना शासनाचे आर्थिक हित जपले गेले आहे का, जागांचे योग्य मूल्यांकन झाले आहे का आणि संबंधित व्यवहारात नियमांचे पालन करण्यात आले आहे का, याची कागदपत्रांसह पडताळणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शासकीय जागा ही जनतेची मालमत्ता असल्याने या व्यवहारांची चौकशी स्वतंत्र तपास पथकामार्फत करण्यात यावी. चौकशीत दोषी आढळणारे अधिकारी, पदाधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन चौकशी सुरू न केल्यास नागरिकांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजेंद्र देवकर यांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे श्रीरामपूरकरांचे लक्ष लागले आहे.

आ. आशुतोष काळेंच्या प्रयत्नांतून १५ गावांत प्रवासी निवारे उभारणार; ३ कोटींचा निधी मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोळपेवाडी : कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नांतून १५ गावांमध्ये प्रवासी निवारे उभारण्यासाठी राज्य शासनाने तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून ऊन, वारा आणि पावसात बसची प्रतीक्षा करणाऱ्या ग्रामीण भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निधीतून कोपरगाव तालुक्यातील झगडे फाटा, सुरेगाव, कुंभारी, माहेगाव देशमुख, धामोरी फाटा, जवळके, मढी बुद्रुक, तळेगाव मळे, हंडेवाडी फाटा आणि कान्हेगाव फाटा, तसेच राहाता तालुक्यातील वाकडी, धनगरवाडी, चितळी, शिंगवे आणि जळगाव या १५ ठिकाणी प्रवासी निवारे उभारण्यात येणार आहेत.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी बस हे दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना बसची प्रतीक्षा करताना निवाऱ्याअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन काळे यांनी परिवहन विभागाकडे प्रस्ताव सादर करून सातत्याने पाठपुरावा केला होता. दरम्यान, कोपरगाव बस आगाराला पाठपुराव्यातून १० नवीन लालपरी आणि १५ जिजाऊ अशा एकूण २५ बस उपलब्ध झाल्या आहेत. बस आगारातील बस चार्जिंग केंद्र आणि बसस्थानकालगतच्या व्यापारी संकुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. बसस्थानक परिसरात सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठीही निधी मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रवाशांच्या सुविधांसाठी मंजूर केलेल्या निध्याबद्दल आमदार काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले. मतदारसंघातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी यापुढेही प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षक नेतेगिरीचा बुरखा फाडा; आधी नेत्यांच्या शाळांची तपासणी करा!

ऑनलाइन कामांच्या मोर्चाचा अचानक युटर्न; शिक्षणाधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी करणाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हिशेब द्यावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकांच्या ऑनलाइन कामातून सुटका मिळावी, या मागणीसाठी जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढणाऱ्या शिक्षक नेत्यांनी अचानक प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या बदलीची मागणी पुढे आणली. बदली न झाल्यास त्यांना गचांडून बाहेर काढण्याची धमकी देण्यापर्यंत आंदोलनाची भाषा पोहोचली. मात्र, शिक्षकांच्या प्रश्नांवर आक्रमक होणाऱ्या नेत्यांच्या स्वतःच्या शाळांमध्ये विद्यार्थी किती शिकतात, शिक्षक नियमित उपस्थित असतात का आणि प्रत्यक्ष अध्यापन किती होते, याची तपासणी करण्याची मागणी आता पालक वर्गातून जोर धरू लागली आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी नवोदय प्रवेश परीक्षा, आरंभ व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा निकाल वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये मिशन आपुलकी अंतर्गत संगणक लॅब उभारणे, खासगी शाळांच्या तोडीच्या सुविधा मराठी शाळांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणे, अशा शैक्षणिक उपक्रमांतून जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. अशा कामांची दखल घेण्याऐवजी थेट बदलीची मागणी आणि धमकीची भाषा वापरण्यामागे नेमका उद्देश काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

शिक्षकांच्या प्रश्नांवर मोर्चे काढणाऱ्या नेत्यांनी आधी स्वतःच्या शाळेचा आरसा पाहावा! पारनेर तालुक्यातील एका शाळेत अवघे सात विद्यार्थी असताना दोन शिक्षक कार्यरत असल्याची माहिती आहे. यातील एक शिक्षक संघटनेचा नेता असून तो नियमित शाळेत उपस्थित राहत नसल्याचा आरोप आहे. शिक्षक नेतेगिरी करणाऱ्यांच्या शाळांची अचानक तपासणी झाली, तर किती नेते प्रत्यक्ष वर्गात विद्यार्थ्यांना शिकवतात आणि किती जण केवळ हजेरी लावून संघटनात्मक राजकारण करतात, याचे वास्तव समोर येईल.

शासन शिक्षकांना विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी वेतन देते; संघटनांचे झेंडे मिरवण्यासाठी किंवा अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यासाठी नव्हे. ऑनलाइन कामांचा त्रास असेल तर त्यावर चर्चा आणि आंदोलन करण्याचा अधिकार शिक्षकांना आहे. मात्र, त्याच आंदोलनाच्या आड वैयक्तिक आरोप, बदलीची मागणी आणि धमकीची भाषा वापरून अधिकाऱ्यांना लक्ष्य करणे कितपत योग्य? इतरांना ज्ञान देणाऱ्या शिक्षकांनी आंदोलनात संयम आणि सभ्यता सोडली, तर शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा कुठे राहणार?

आज प्राथमिक शिक्षणाचा दर्जा घसरत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. परिणामी पालकांचा ओढा खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढत आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये सुविधा, संगणक लॅब आणि गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न होत असताना त्या प्रयत्नांना बळ देण्याऐवजी अधिकारी हटविण्याच्या मागणीवर भर दिला जात असेल, तर त्यामागील कारणांचाही शोध घेतला पाहिजे.

शिक्षकांच्या मतांसाठी राजकीय नेत्यांनी केवळ शिक्षकांची बाजू घेऊ नये; सर्वसामान्य पालक आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याची बाजूही ठामपणे मांडावी. ऑनलाइन कामांच्या प्रश्नावर आंदोलन करणाऱ्या शिक्षक नेत्यांच्या शाळांची उपस्थिती, विद्यार्थी संख्या, अध्यापन आणि निकाल यांची निष्पक्ष तपासणी करा. शाळेत किती वेळ शिकविले जाते, विद्यार्थी किती शिकतात आणि नेतेगिरी करणारे शिक्षक प्रत्यक्ष शाळेत किती वेळ असतात, याचा हिशेब जनतेसमोर येऊ द्या.

अधिकाऱ्यांच्या बदलीसाठी दबाव टाकणाऱ्यांच्या शाळांची तपासणी झाली, तर नेतेगिरीचे अनेक बुरखे फाटतील का? हा सवाल आता पालक वर्गातून उपस्थित होत आहे.

खासदार निलेश लंके यांनी वस्तूस्थिती जाणून घ्यावी

खा.निलेश लंके यांना शिक्षकांची बाजू घेण्याचा राजकीय नेता म्हणून पुर्ण अधिकार आहे.ज्या शिक्षक नेत्यांनी खा. लंके यांच्या कानावर काही गोष्टी घातल्या असतील.त्याची वस्तूस्थिती जाणून घेतल्यानंतरच पुढचे पाऊल उचलले पाहिजे. शिक्षक नेते स्वतःची पोळी खा.लंकेच्या तव्यावर भाजीत आहेत याचेही भान नेत्यांनी ठेवले पाहिजे असे पालक वर्गातून बोलले जात आहे.

दुष्काळग्रस्तांची वीजबिले माफ करा स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा, मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



आधी : संगमनेर तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण भागातील लहान व्यावसायिक आणि गाळेधारकांची घरगुती वीजबिले माफ करावीत, तसेच स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तातडीने थांबवावी, अशी मागणी भाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास भाऊसाहेब गायकवाड यांनी महावितरणच्या संगमनेर विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दुष्काळसदृश परिस्थिती, शेतीमालाला मिळणारा कमी बाजारभाव, वाढता उत्पादन खर्च आणि रोजगाराच्या अभावामुळे ग्रामीण भागातील नागरिक आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर कुटुंबांची घरगुती वीजबिले पूर्णतः माफ करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच लहान दुकानदार व गाळेधारकांसाठी विशेष वीजबिल सवलत योजना लागू करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ग्राहकांना पूर्वसूचना द्यावी, मीटरची तांत्रिक माहिती व अचूकतेचा अहवाल उपलब्ध करून द्यावा आणि तक्रारींचे निराकरण होईपर्यंत मीटर बसविण्याची सक्ती स्थगित ठेवावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी कायदेशीर नोटीस द्यावी आणि चुकीच्या वीजबिलांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही केली आहे. मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास वरिष्ठ कार्यालयासह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागण्याचा इशारा गायकवाड यांनी दिला आहे.

पान १ वरुन

सात दिवसांचे उपोषण अखेर स्थगित

आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.या आंदोलनात सात दिवस संयमाने साथ देणाऱ्या विविध गावांतील शेतकरी, तरुण कार्यकर्ते तसेच श्रीरामपूर आणि विरगाव पोलिसांचे गणेश तांबे यांनी आभार मानले. यावेळी श्रीरामपूर-वैजापूर पाटबंधारे विभागाचे अधिकारी, रामपूर, महाकाळवाडगाव, सरला गोवर्धन, वांजरगाव, नागमठाण, चांदेगाव, हमरापूर, बाजाठाण, कमालपूर आणि खानापूर येथील प्रमुख कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रागाने माहेरी आलेल्या विवाहितेचे अपहरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : पतीशी वाद झाल्याने माहेरी आलेल्या २३ वर्षीय विवाहित तरुणीचे अपहरण करून पळवून नेण्यात आले. सदर घटना राहुरी तालुक्यातील एका गावात दि. १७ नोव्हेंबर रोजी दुपारी उघडकीस आली. या बाबत राहुरी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. एक २३ वर्षीय विवाहित तरुणी तिच्या पतीसह पुणे येथे राहत आहे. तरुणीचे तीच्या पती सोबत वाद झाल्याने तरुणीचा भाऊ पुणे येथे गेला आणि त्याने बहिणीला माहेरी राहुरी येथे घेवुन आला. दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास पिडीत तरुणी बाथरूमला जाते असे सांगून घरातून बाहेर गेली. बराच वेळ झाला तरी पिडित तरुणी घरी आली नसल्याने तिच्या नातेवाईकांनी परिसरात तिचा शोध घेतला, मात्र ती कुठेही मिळवून आली नाही. तेव्हा नातेवाईकांची खात्री झाली की, कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता तीला फूस लावून पळवुन नेले. घटनेनंतर राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. १२७७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १४०(३) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

रोहित पठारे हत्याकांडाचा तपास सीआयडीकडे; इतर गुन्हे एसआयटीकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : रोहित पठारे हत्याकांड आणि त्याच्या पार्श्वभूमीवर दाखल झालेल्या परस्परविरोधी गुन्ह्यांच्या तपासाबाबत मोठी प्रशासकीय घडामोड घडली आहे. एकाच घटनाक्रमाशी संबंधित दोन्ही तपास स्थानिक पोलिसांकडून काढून घेण्यात आले आहेत. हत्याकांडाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी), तर यापूर्वी दोन गटांत झालेल्या हाणामारीनंतर दाखल झालेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपविण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपासाची संपूर्ण दिशा आता बदलली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी रोहित पठारे हत्याकांडाचा तपास एसआयटीमार्फत सुरू असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी भागवत फुंदे यांनी स्पष्ट केले होते. मात्र, आता हत्याकांडाचा तपास सीआयडीकडे वर्ग झाल्याची माहिती छत्रपती संभाजीनगरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांनी दिली. तर पूर्वीच्या हाणामारीच्या गुन्ह्यांच्या तपासाची जबाबदारी बीड जिल्ह्याच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षकांकडे सोपविण्यात आली आहे.

या प्रकरणात सुरुवातीपासूनच तपासाच्या कार्यपद्धतीवर आंदोलकांनी प्रश्न उपस्थित केले होते. आरोपींच्या अटकेसह तपासातील विविध बाबींवर पोलिसांना जाब विचारण्यात आला होता. तपास अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही आक्षेप नोंदविण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर भीम आर्मीचे प्रमुख तथा खासदार चंद्रशेखर आझाद यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईत महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक डॉ. सदानंद वसंत दाते यांची भेट घेतली. यावेळी आंदोलक अशोक कांबळे यांनी संपूर्ण घटनाक्रम आणि आपली बाजू महासंचालकांसमोर मांडली होती.

आता सीआयडीकडे तपास गेल्यानंतर हत्याकांडातील घटनाक्रमाची नव्याने पडताळणी होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षदर्शींचे जबाब, सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि आरोपींच्या स्वतंत्र भूमिकांचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. यापूर्वीच्या तपासातील त्रुटी, दुर्लक्षित बाबी किंवा नव्याने समोर येणारे पुरावे यांचीही चौकशी होऊ शकते. दुसरीकडे, एसआयटीकडून पूर्वीच्या हाणामारीच्या गुन्ह्यांची स्वतंत्र तपासणी केली जाणार आहे.

एकाच घटनाक्रमातील दोन टप्प्यांच्या तपासासाठी दोन स्वतंत्र यंत्रणा नियुक्त झाल्याने आता तपासातील प्रत्येक निष्कर्ष महत्त्वाचा ठरणार आहे. स्थानिक पोलिसांच्या तपासावर उपस्थित झालेल्या प्रश्नांना सीआयडी आणि एसआयटीच्या चौकशीतून उत्तरे मिळतात का, तसेच हत्याकांडामागील संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होतो का, याकडे वैजापूरकरांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या संघर्षाला यश; आजपासून नांदूर-मधमेश्वर कालव्यातून पाणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : यंदाच्या खरीप हंगामात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आता रब्बी हंगाम वाचविण्यासाठी नांदूर-मधमेश्वर कालव्याच्या पाण्याची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संघर्षाला अखेर यश आले आहे. शुक्रवारपासून (दि. २०) कालव्यातून दीड टीएमसी पाणी सोडण्यात येणार असून, हे आवर्तन २० ते २२ दिवस सुरू राहणार आहे. जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाबळे यांनी ही माहिती दिली.

पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी झाला असून भूजल पातळीही खालावली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. पाण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन व आमरण उपोषण केले. त्यानंतर ३१ ऑक्टोबरला जांबरगाव येथे महिला व शेतकऱ्यांनी समृद्धी महामार्गावर सुमारे तीन तास रास्ता रोको केला. अखेर २ नोव्हेंबरच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आवर्तनाचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी 'टेल टू हेड' पद्धतीने पाणी सोडण्याचे नियोजन आहे. प्रथम गंगापूर तालुक्यातील शेवटच्या टोकाला, त्यानंतर वैजापूर आणि शेवटी कोपरगाव तालुक्याला पाणी दिले जाणार आहे. मात्र, कालव्याच्या प्रवासात होणारा अनधिकृत पाणीउपसा रोखण्याचे मोठे आव्हान जलसंपदा विभागासमोर आहे. सुरुवातीच्या भागातच पाणी अडविले गेल्यास शेवटच्या गावांतील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळणे कठीण होऊ शकते.

नांदूर-मधमेश्वर रूपांतर कालव्याची लांबी सुमारे १२० किलोमीटर असून, ४३ हजार ५६० हेक्टर सिंचन लाभक्षेत्र आहे. वैजापूर तालुक्यातील ४९, गंगापूरमधील ४६ आणि कोपरगावमधील सात अशा एकूण १०२ गावांचा या योजनेत समावेश आहे. ४९ पोटचाऱ्यांद्वारे पाणीवाटप केले जाणार आहे. या आवर्तनामुळे रब्बी पिकांना दिलासा मिळण्यासह भूजल पुनर्भरणालाही मदत होणार आहे.

दरम्यान, पाणीवाटपावरून वाद होऊ नयेत यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी ११ जानेवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. अवैध पाणीउपसा, कालव्याच्या दरवाजांमध्ये हस्तक्षेप आणि पाणीवाटपात अडथळा आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आता नियोजित आवर्तनाचे पाणी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचते का, याकडे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

नेवाशात लंघे पाटलांच्या दिवाळी फराळाला हजारोंची उपस्थिती

जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुजय विखे पाटील यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या वतीने दिवाळीनिमित्त नेवासा फाटा रस्त्यावरील लक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी फराळ कार्यक्रमाला हजारो नागरिक, कार्यकर्ते आणि चाहत्यांनी उपस्थिती लावली. यावेळी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी खासदार सुजय विखे पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. सहकार क्षेत्रात काम करताना सहकार आणि राजकारणाची गल्लत होऊ देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. पाण्याच्या योग्य नियोजनामुळे तालुक्यातील सुमारे २१ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना सुजय विखे पाटील म्हणाले, जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली असली तरी सर्वसामान्यांच्या सेवेसाठी यापुढेही पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहणार आहे. बँकेच्या माध्यमातून काम करताना शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता भविष्यातील पाण्याचे नियोजन महत्त्वाचे असून त्यासाठी सर्वांनी संयम आणि समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. राजकीय तडजोडी करताना कार्यकर्त्यांचा बळी दिला जाणार नाही, तर त्यांच्या सन्मानाला प्राधान्य दिले जाईल. सुसंस्कृत आणि विकासाभिमुख राजकारणातूनच समाजाची प्रगती साधता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार लंघे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या देवगड येथील १३ गावांना जोडणाऱ्या



पादचारी पुलासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहितीही सुजय विखे यांनी दिली. कार्यक्रमाला माजी आमदार पांडुरंग अभंग, जिल्हा भाजपाध्यक्ष नितीन दिनकर, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्यासह विविध आश्रमांचे महंत व महाराजांनीही कार्यक्रमाला भेट दिली. आमदार लंघे पाटील व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने संतपूजन करण्यात आले. राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी आभार मानले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात उंदीरगाव ग्रामपंचायतीचा सहभाग



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० अंतर्गत श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव ग्रामपंचायतीने सहभाग नोंदवत गावात विविध उपक्रम राबविले. या अभियानांतर्गत ग्रामपंचायतीच्या वतीने गाव परिसरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी ग्रामस्वच्छता मोहीम आणि श्रमदान उपक्रम घेण्यात आला. यामध्ये गटविकास अधिकारी डॉ. स्मिता निकाळजे, पंचायत समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, महिला आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गावातील स्वच्छता राखणे, सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी गटविकास अधिकारी डॉ. स्मिता निकाळजे आणि विस्तार अधिकारी विजय चराटे यांच्या हस्ते गावात आंब्याच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड आणि त्यांचे संगोपन करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या उपक्रमास अशोक कारखान्याचे माजी अध्यक्ष सुरेश गलांडे, कारखान्याचे संचालक वीरेश गलांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, सरपंच प्रतिभा गोलवड, उपसरपंच अलमनूर शेख, आरोग्य अधिकारी डॉ. राजगुरू, सुधीर ताके, ज्ञानेश्वर बांद्रे, किशोर बर्डे, रमेश पंडित, ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप आसने उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत कर्मचारी शोएब शेख, संजय काळे, दीपक बोधक, नारायण बत्तीसे, काशिनाथ आव्हाड, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, नितीन गलांडे, दिलीप गलांडे, उत्तम वाघ, पत्रकार चेडे, मोबीन शेख यांच्यासह ग्रामस्थांनी श्रमदान मोहिमेत सहभाग घेतला.

साऊ एकल महिला समिती महाराष्ट्रात चांगलं काम करते : नानासाहेब पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : येथे साऊ एकल महिला समितीच्या वतीने दिवाळीनिमित्ताने एक महिलांना फराळाचं वाटप माजी सभापती नानासाहेब पवार व ज्येष्ठ पत्रकार दिलीप लोखंडे, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार म्हणाले, एकल महिलांना या समाजापासून उपेक्षित असून त्यांना समाजात मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही समिती चांगले काम करीत आहे, शासनाच्या प्रत्येक योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहे, बाल संगोपनाचे प्रकरणसाठी शासन संघर्ष करून लाभधार बालकांना पैसे मिळवून दिले, विधवांचे डोल योजना, प्रत्येक योजनेचे पाठपुरावा करून व एकल महिलांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी प्रयत्न करीत आहे, शासन दरबारी साऊ महिला समिती महाराष्ट्रभर चांगले काम करीत आहे, त्यांच्या वतीने दिवाळी सणानिमित्त फळाचा वाटप करून चांगला उपक्रम राबवल आहे,

आपल्या गावात तीनशे घरकुल मंजूर आहे, जागे अभावी रखडले आहे, लवकरच पालकमंत्री नामदार राधाकिसन विखे पाटील यांना बोलून हा प्रश्न मार्गी लावणार आहे, व शासन आपल्या दारी एक मोठा कार्यक्रम घेणार आहोत,लवकरच आपल्या ऑफिसमध्ये शासकीय सर्व योजनांचे विनामूल्य फॉर्म भरणे दिले जाणार आहे, याचा महिला व वृद्ध यांनी लाभ घ्यावा असे आवाहन पवार यांनी केले आहे,

यावेळी साऊ एकल महिला समितीचे श्रीरामपूर तालुका समन्वयक पत्रकार दिलीप लोखंडे यांनी समितीच्या कार्याची माहिती दिली, टाकळीभानचेअध्यक्ष मंगलताई जाधव, व उपाध्यक्ष मंगलताई खरात यांनी मनोगत व्यक्त केले, यावेळी एकल महिलांना फराळाचं वाटप करण्यात आले, यामुळे महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता, यावेळी विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे पुरोहित राजेंद्र देवळाकर, अशोकराव शेंडे , तिलोत्तमा शिंदे,सरला सुलताने, मंगल साळवे, अरुणाबाई गव्हाणे, नंदा गांगोडे, सुनीता कुदळ, लताबाई काकडे, लताबाई पटारे, जानकाबाई शेंडे, नानूबाई गांगुर्डे, अलकाबाई शिंगारे, जया रणवरे, शालन रणनवरे, चंद्रकांत खैरे ,लहानुबाई निकम, कौसाबाई मोरे, आदी एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते, मंगलबाई खरात यांनी उपस्थितीचे आभार मानले,

बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाची वर्षावास सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान: काल दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मेजर विनोद रणनवरे यांच्या नेतृत्वाखाली टाकळीभान येथे सुजाता बुद्ध विहार मध्ये संविधान ग्रुप प्रतिष्ठानच्या वतीने बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचा वर्षावास पूर्ण करण्यात आला. यावेळी कार्यक्रमांमध्ये अन्नदान व भीम गीताचा कार्यक्रम मोठ्या उत्साह मध्ये साजरा करण्यात आला व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी परिश्रम घेणारे किशोर मामा रणपिसे, अनिता तडके ,शामराव खरात मामा ,लखन मनोहर रणनवरे, शंकर रणनवरे ,सतीश शिवाजी रणनवरे, आनंदा रणनवरे ,संदीप जाधव ,राहुल साठे, विजय आहेर, शिवलिंग साठे,आप्पासाहेब रणनवरे, रवींद्र सुरेश रणनवरे, रवी गाढे, भाऊसाहेब गव्हाणे, अशोक साबळे, राहुल संभाजी रणनवरे ,अरुण वाकडे,,सागर रणनवरे, प्रतिक रणनवरे, प्रवीण नेब, या सर्वांचे कार्यक्रमास सहकार्याबद्दल व उपस्थितीबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.



निधनवार्ता

हौशीनाथ जमधाडे यांचे निधन



नेवासा : तालुक्यातील जेऊर हैबती येथील जागरण गोंधळ कलावंत हौशीनाथ कोंडीराम जमधाडे (वय ६८) यांचे अकस्मात निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ ,एक बहीण,एक मुलगा,दोन मुली सूना,नातवंडे असा परिवार आहे. इलेक्ट्रीशन प्रशांत जमधाडे यांचे ते वडील होते.

सरुबाई बनकर



टाकळीभान: येथील शेतकरी कुटुंबातील गं.भा. सरुबाई तुळशीराम बनकर (वय ७६) वर्षे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी रघुनाथ तुळशीराम बनकर यांच्या त्या मातोश्री होत.

तुकाराम ढाले



सोनई - लोहगाव रोडवरील निवासी जुन्या पिढीतील तुकाराम लक्ष्मण ढाले (वय ९३) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिरेगाव ता. नेवासा. विद्यालयाचे मुख्याध्यापक लहाणू ढाले यांचे ते वडील होत.

वाकडी, रामपुरवाडी, चितळी व धनगरवाडीचे बंधारे, पाणीपुरवठा योजनेचे तलाव तातडीने भरावेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : राहाता तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, तालुक्यातील वाकडी, रामपुरवाडी, चितळी आणि धनगरवाडी या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या गंभीर बनली आहे. या गावांतील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता लक्षात घेता, निळवंडे प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या आवर्तनातून गावांतील सर्व पाणी साठवण बंधारे तसेच पाणीपुरवठा योजनेचे तलाव तातडीने भरून द्यावेत, अशी मागणी आ. विवेक कोल्हे यांनी केली आहे.

यासंदर्भात आ. विवेक कोल्हे यांनी उर्ध्व प्रवरा प्रकल्प विभाग (निळवंडे-२), घुलेवाडी, ता. संगमनेर येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की,कोपरगाव विधानसभा मतदार संघातील राहाता तालुक्यातील वाकडी, रामपुरवाडी, चितळी व धनगरवाडी परिसरात यंदाच्या वर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्यामुळे संबंधित गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे.उपलब्ध पाणीसाठा अपुरा पडत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी, तर शेतकरी बांधवांना शेतीसाठी पाण्याची मोठी अडचण भेडसावत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित गावांतील ग्रामपंचायतींचे सरपंच आणि नागरिकांनी पाणी साठवण बंधारे व पाणीपुरवठा योजनेचे तलाव कालव्याच्या आवर्तनातून भरून देण्याची मागणी आ. कोल्हे यांच्याकडे केली होती.या मागणीची दखल घेत आ.विवेक कोल्हे यांनी निळवंडे प्रकल्पाच्या डाव्या कालव्यासह त्यावरील शाखा कालव्याच्या सुरू असलेल्या आवर्तनातून वाकडी, रामपुरवाडी, चितळी आणि धनगरवाडी येथील सर्व पाणी साठवण बंधारे व पाणीपुरवठा योजनेचे तलाव तातडीने भरून देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी विनंती निवेदनाद्वारे केली आहे.

चारही गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईतून दिलासा मिळावा आणि उपलब्ध पाणीसाठ्यामुळे शेतीच्या गरजाही भागविण्यास मदत व्हावी, यासाठी पाटबंधारे विभागाने या मागणीची तातडीने दखल घेऊन सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी आ. विवेक कोल्हे यांनी केली आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा
शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

	१८०		१४९		१२८
९	२३४	४	२४८	१	२९०
	२२५		२००		१५५

९३-०९-४२-५४-१७-२१

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

	१२०		१८९		१२९
३	२३८	८	२६०	२	३४६
	३५५		२३३		२५५

३७-१३-८९-५८-२०-६२

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

	१४०		१२३		१४५
५	२५८	६	२४०	०	२३५
	३६६		४६६		२९९

५४-१५-६२-३६-०९-२०

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
६८०	३८९
४७	०४
३४०	१३०

dpbosssss.live Mydpboss.com

'कभी खुशी कभी गम'मधील रायचंद हाऊस चाहत्यांसाठी खुले होणार !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : बॉलिवूडमधील लोकप्रिय चित्रपट 'कभी खुशी कभी गम'ला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने चित्रपटातील प्रसिद्ध रायचंद हाऊस चाहत्यांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. एअरबीएनबीने 'ॲट होम विथ द रायचंद्स' या विशेष उपक्रमाडरे मुंबईत रायचंद कुटुंबाचे काल्पनिक जग प्रत्यक्षात साकारण्याचा निर्णय घेतला आहे. चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक करण जोहर या उपक्रमाचे आयोजन करणार आहेत.

'कभी खुशी कभी गम' या चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीत लोकप्रियतेचा नवा ठसा उमटवला. चित्रपटातील कौटुंबिक नाट्य, भव्य दृश्ये, कलाकारांची वेशभूषा आणि संस्मरणीय संवाद आजही चाहत्यांच्या स्मरणात आहेत. यातील रायचंद हाऊस हे चित्रपटाचे खास आकर्षण ठरले होते. आता चाहत्यांना या घरात प्रवेश करून चित्रपटातील आठवणी पुन्हा अनुभवण्याची संधी मिळणार आहे.



या अनुभवात चित्रपटातील पात्रे, फॅशन आणि खास प्रसंगांची झलक पाहायला मिळणार आहे.

हा विशेष अनुभव १ ते ६ डिसेंबरदरम्यान उपलब्ध असेल. यासाठी केवळ १८० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. बुकिंग २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता [airbnb.com/k3g](http://airbnb.com/k3g?utm_source=chatgpt.com) या संकेतस्थळावर सुरू होणार आहे. विशेष म्हणजे या अनुभवासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, मुंबईपर्यंत येण्या-जाण्याचा प्रवासखर्च सहभागी चाहत्यांना स्वतः करावा लागणार आहे.

करण जोहर यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करताना चित्रपटातील घर, कुटुंब आणि नातेसंबंधांच्या आठवणी चाहत्यांना प्रत्यक्ष अनुभवता येणार असल्याचे सांगितले. रोहनची भूमिका साकारणारे हृतिक रोशन आणि पूच्या भूमिकेतील करीना कपूर खान यांनीही २५ वर्षांनंतर चित्रपटाच्या आठवणींना उजाळा मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

एअरबीएनबी इंडियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज यांनीही हा उपक्रम चित्रपटाचा वारसा आणि चाहत्यांचे प्रेम साजरे करण्याचा अनोखा प्रयत्न असल्याचे सांगितले.

महामार्गासाठी शेतकऱ्यांवर अन्याय नको

भूसंपादनाची पारदर्शक फेरतपासणी करा : आ.पवार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

जामखेड : मतदारसंघातील शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आ. रोहित पवार यांनी आज जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. जामखेड तालुक्यातून जाणाऱ्या प्रस्तावित सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गाच्या भूसंपादनातील त्रुटी, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रलंबित भरपाई, मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेली सक्तीची वसुली, जलजीवन मिशनची रखडलेली कामे आणि दुष्काळामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांकडे त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. तसेच मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था, नागरिकांच्या तक्रारी आणि दबावाखाली होणाऱ्या चुकीच्या कारवायांबाबत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचीही भेट घेऊन चर्चा केली.

जामखेड तालुक्यातील १३ गावांमधून प्रस्तावित सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग जाणार असून यासाठी प्रशासनाने संबंधित गावांतील शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटिसा दिल्या आहेत. मात्र, या प्रक्रियेत अनेक त्रुटी असल्याचा आणि जमिनीच्या मूल्यांकनाबाबत संभ्रम असल्याचा मुद्दा शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. याबाबत आ. रोहित पवार यांनी संबंधित शेतकऱ्यांसह जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. महामार्गाला आमचा विरोध नाही, विकास झाला पाहिजे; मात्र विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांवर अन्याय होता कामा नये, ही आमची स्पष्ट भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. जमिनीचे योग्य मूल्यांकन करून शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळावा, भूसंपादन प्रक्रियेतील त्रुटी दूर कराव्यात आणि संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शक फेरतपासणी करावी. शेतकऱ्यांच्या सर्व हरकतींचे निराकरण झाल्याशिवाय कोणतेही भूसंपादन करू नये, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.



मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जत-जामखेड मतदारसंघात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अनेक ठिकाणी शेतजमिनी खरवडून गेल्या, तर विहिरी, विद्युत पंप, शेतीची अवजारे आणि सोलर पंपांचेही मोठे नुकसान झाले. मात्र, अद्यापही अनेक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून भरपाई मिळालेली नाही. एकीकडे मागील अतिवृष्टीच्या नुकसानीची भरपाई मिळालेली नाही, तर दुसरीकडे दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे अतिवृष्टीतील नुकसानीची भरपाई तातडीने द्यावी, अशी मागणी आ. रोहित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. यासंदर्भातील पत्रही त्यांना दिले.

दुष्काळी परिस्थितीचा फायदा घेत मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून महिला आणि सर्वसामान्य कर्जदारांची सक्तीने कर्जवसुली केली जात असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. सध्या अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने अशा सक्तीच्या वसुलीमुळे त्यांच्यावरील संकट आणखी वाढत आहे. त्यामुळे मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या कर्जवसुलीला स्थगिती मिळावी, यासाठी शासनाने रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा करावा. तसेच सक्तीच्या आणि बेकायदेशीर वसुलीच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

मतदारसंघातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू आहेत. यातील अनेक कामे ९० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झाली असून काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. मात्र, ठेकेदारांची बिले थकल्यामुळे उर्वरित कामे रखडली आहेत. परिणामी, कामे जवळपास पूर्ण होऊनही नागरिकांना या योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे ठेकेदारांची थकीत बिले तातडीने अदा करावीत, पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा आणि उर्वरित कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेला निर्देश द्यावेत, अशी मागणी आ. रोहित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. दुष्काळामुळे कर्जत-जामखेडमधील अनेक गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांवर पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

द•ख•ल



दत्तात्रय शिंदे यांचा कलाभूषन रघुवीर खेडकर यांनी स्मृतिचषक देऊन केला गौरव!

हातगाव : महाराष्ट्राचे थोर व नामवंत तमाशा कलावंत स्वर्गीय संगितरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक, लोकनाट्य व तमाशा महोत्सवात शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील दत्तात्रय गुंडीबा शिंदे ऊर्फ तात्या यांचा स्मृतिचषक देऊन गौरव करण्यात आला आहे.पद्मश्री कलाभूषण रघुवीर खेडकर यांच्या तमाशा मंडळाच्या वतीने हा सन्मान करण्यात आला. स्वर्गीय दत्ता महाडिक पुणेकर यांचे चिरंजीव सुहास महाडिक पुणेकर व गणेश महाडिक पुणेकर यांच्या हस्ते मंगरूळ पारगाव येथे दत्तात्रय शिंदे यांना स्मृतिचषक प्रदान करण्यात आले आहे. शिंदे गेल्या ४० वर्षांपासून बोधेगाव येथे येणाऱ्या विविध तमाशा मंडळांची निःस्वार्थपणे सेवा करत आहेत. कलावंतांना पिण्याचे पाणी, राहण्याची जागा, स्वच्छता, आवश्यक साहित्य तसेच नाश्त्याची व्यवस्था करून ते कलावंतांना आपुलकीने सहकार्य करतात. तमाशा मंडळाच्या आगमनापासून ते येणाऱ्या तमाशा मंडळाचा संपूर्ण ताफा मार्गस्थ होईपर्यंत ते संपूर्ण जबाबदारीने काळजी घेतात. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेऊन त्यांना स्मृतिचषक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी गीतकार अशोक काटे तसेच भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे माजी केंद्रीय समिती सदस्य भाई आकाश निर्मळ उपस्थित होते. या सन्मानाबद्दल दत्तात्रेय शिंदे यांनी आयोजक, महाडिक कुटुंबीय आणि उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. चार दशकांच्या लोककला सेवेचा हा गौरव बोधेगावच्या सांस्कृतिक परंपरेसाठी अभिमानाची बाब ठरला असून या सन्मानामुळे शिंदे तात्या यांचे बोधेगाव परिसरासह शेवगाव तालुक्यातून विविध क्षेत्रातून अभिनंदन होताना ऐकावयास मिळत आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार प्रेरणादायी : डॉ भास्कर‌राव शिरोळे

निघोज : शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार शिवसैनिक व सर्वसामान्य जनतेला आजही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर शिवसेना उपजिल्हाप्रमुख डॉ. भास्कर‌राव शिरोळे यांनी व्यक्त केले आहे. पारनेर तालुक्यातील अळकुटी येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. स्मिताताई शिरोळे, युवा नेते संजयशेठ मते, माजी चेअरमन बाळासाहेब चौधरी, बन्सीशेठ डेरे, मनिष गायकवाड, माजी उपसरपंच अरिफभाई पटेल, कट्टर शिवसैनिक श्रीपती शिरोळे आदी तसेच ग्रामस्थ व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. शिरोळे यावेळी म्हणाले मुंबईत महाराष्ट्रीय माणसांना खरा आधार देण्याचे काम हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी केले म्हणून आज मराठी माणूस स्वाभिमानाने मुंबईत हक्काने राहात आहे. ठाकरे यांचे विचार महाराष्ट्राला प्रेरणादायी आहेत. ठाकरे यांनी ठाकरी भाषेत देशातील नेत्यांचा समाचार घेऊन राज्याला स्वाभिमानी बनवले आहे. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून आज खऱ्या अर्थाने मराठी बाणा तयार झाला म्हणून मुंबई आज आपल्याकडे हक्काने राहीली आहे. बाळासाहेब ठाकरे हे ज्वलंत विचार होते त्यांच्या विचाराचा प्रभाव आजही जनतेमध्ये दिपस्तंभासारखा तेवत राहिल्याने शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. कट्टर शिवसैनिक श्रीपती शिरोळे यांच्या सारखे शेकडो शिवसैनिक राज्यात ठाकरे यांचे विचार जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन डॉ. शिरोळे यांनी व्यक्त केले आहे.

दहिगाव-ने येथे ६४ वा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न


एरंडगाव-ने : दहीगाव-ने येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आयोजित ६४ वा अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. स्व. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्यासह संत-महंतांच्या आशीर्वादाने सुरू झालेल्या या सप्ताहाची परंपरा आजही उत्साहात जपली जात आहे. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त महंत ह. भ. प. उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांचे काल्याचे कीर्तन झाले. यावेळी युवा नेतृत्व डॉ. क्षितिज घुले पाटील, ह. भ. प. मंडलिक महाराज, ह. भ. प. सुदाम शास्त्री व ह. भ. प. अशोक महाराज बोरुडे यांच्या हस्ते हरिनामाचा जागर करणाऱ्या वारकऱ्यांचा वारकरी पोशाख देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये ह. भ. प. यादवराव महाराज बारगुजे, ह. भ. प. निवृत्ती खरड, शंकर खरड, अण्णा पांडुरंग गायके, दत्तात्रय लोखंडे, लक्ष्मण थोरात व लताबाई पवार यांचा समावेश होता. यावेळी रामनाथ राठी, माजी सरपंच रघुनाथ राठी, डॉ. अरुण पवार, बाळासाहेब मरकड उपस्थित होते.

दुष्काळी स्थिती तरी वांबोरी चारीचे पाणी मिळावे : पाठक

पाण्यासाठी पालकमंत्र्यांना साकडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

करंजी : दुष्काळी परिस्थिती असून फळबागा व पशुधन टिकवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे यावर्षीच्या भीषण दुष्काळामध्ये तरी किमान प्रामाणिकपणाने वांबोरी चारीचे पाणी वांबोरी चारी योजनेच्या शेवटच्या गावांना मिळावे अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना वांबोरी चारी कृती समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी निश्चितपणे पाणी देऊ असे आश्वासन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी कृती समितीच्या सदस्यांना दिले.



यावेळी बोलताना प्रगतशिल शेतकरी व कृती समितीचे बंडूशेठ पाठक म्हणाले की यापूर्वी सहा वर्षापूर्वी माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील व नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच स्व. आ. शिवाजी कर्डीले यांनी वांबोरी चारी प्रकरणी लक्ष दिले होते. आणि म्हणून शेवटच्या घाटशिरस मढी तलावात पाणी पोहोचले तेही मुबलक प्रमाणात मिळाले. यावर्षी भयानक दुष्काळ आहे अशा परिस्थितीमध्ये फळबागा पशुधन जगवणे गरजेचे आहे आणि म्हणून पाणी निश्चित मिळाले पाहिजे हक्काचे पाणी ६८० एमसीएफटी पाणी पैकी जर भोसे, करंजी , जोहारावाडी, सातवड , कान्होबा वाडी, कौडगाव आदि गावांना मिळाले तर निश्चितच या गावातील शेतकरी फळबागा व पशुधन वाचवु शकतील आणि म्हणून सर्व कृती समितीला घेऊन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली आहे. तसेच याबाबत आमदार अक्षय कर्डिले यांनाही भेटून शेवटच्या वांबोरी चारी च्या शेवटच्या लाभार्थी गावाला पाणी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत व पाणी द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

आमदार अक्षय कर्डिले व पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून निश्चितच करंजी, सातवड या गावाला पाणी मिळेल असे आश्वासन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले असल्याचे पाठक यांनी यावेळी सांगितले या दरम्यान कृती समिती सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदेनी घेतली हभप तनपुरे महाराजांची भेट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

करंजी : आज श्री संत तनपुरे महाराज मठ पंढरपूर येथे महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री माननीय नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी सदिच्छा कौटुंबिक भेट देऊन हरिभक्त परायण बद्रीनाथ महाराज तनपुरे यांची प्रकृती अस्वस्थ मुळे भेट घेतली व त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.यावेळी युती शासनाच्या आणि संस्थेच्या संबंधांना माननीय मंत्री महोदयांनी उजाळा दिला तसेच आगामी काळात संस्थेच्या वाटचालीला शुभेच्छा देऊन भक्कमपणे संस्थेच्या पाठीमागे उभे राहण्याचे आश्वासन दिले.



याप्रसंगी उपस्थितांमध्ये हभप बद्रीनाथ महाराज तनपुरे हभप अनंत महाराज तनपुरे सौ सत्यभामा तनपुरे

डॉक्टर शुभांगी तनपुरे

आमदार अभिजीत आबा पाटील, आमदार राजू खरे, पंढरपूरच्या नगराध्यक्ष प्रणिता ताई भालके ,महेश नाना साठे अनिल दादा सावंत व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले कि राष्ट्रसंत तनपरे बाबांनी महाराष्ट्राच्या भागवत धर्माची पताका महाराष्ट्राबाहेर हिमालया पर्यंत नेली. भक्तांची , गरीब व अंध अपंगाची सेवा करण्यासाठी त्यांनी आयुष्य खर्ची घातले. गाडगे बाबा आणि तनपुरे बाबा यांनी महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम केले.

आदरणीय हिंदुरुदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेब मनोहर जोशी साहेब व इतर मान्यवरांच्या भेटीची आठवण ही शिंदे साहेबांनी काढली.

कर्जत तालुका अनुभवतोय निसर्गाचा लहरीपणा

गेल्यावर्षी ओला तर यंदा सुका दुष्काळ

डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : निसर्गाचा लहरीपणा प्रत्यय कर्जत तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना पुन्हा एकदा आला आहे. अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत निसर्गाने दोन परस्परविरोधी रूपे कर्जत तालुक्यास दाखवली. मागच्या वर्षी दोनदा महापुराचा रौद्रावतार दाखवणारी सीना-नदी यंदा कोरडीठाक पडली असून मागील वर्षी दिवाळीच्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्याला ओल्या दुष्काळाचा सामना करावा लागला होता, तर यंदा पावसाने पाठ फिरवल्याने सुका दुष्काळ आणि तीव्र पाणी-टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आजमितीस कर्जत तालुक्यात ४४ गावांसाठी ३९ पाण्याचे टँकर रस्त्यावर धावत आहे. याने



जवळपास ७९ हजार नागरिकांची तहान भागवली जात असल्याची माहिती पंचायत समितीच्या टंचाई विभागाने दिली.

मागील वर्षी कर्जत तालुक्यात मे महिन्याच्या मध्यान्हातच अवकाळी पावसाने थैमान घालत तब्बल साडेतीनशे मिलिमीटरची नोंद लावली होती. यातच तालुक्यातील तब्बल सर्व पाण्याचे नैसर्गिक जलस्तोत्र ओसंडून वाहिले होते. त्यांनतर मान्सून पावसाने देखील विक्रमी नोंद करीत कर्जत तालुक्यातील सर्व पावसाचे विक्रम मोडीत काढले होते. या काळात प्रथमताच सीनाधरणाच्या इतिहासात जून महिन्यातच धरण १०० टक्के भरले गेले होते. तर सीनानदीने एकदा नव्हे तर दोनदा धोक्याची पातळी ओलांडत आपले रौद्ररूप धारण करीत महापूरजन्य परिस्थिती निर्माण केली होती. या महापुराने नदीकाठच्या गावांना मोठा फटका बसत जनजीवन विस्कळीत झाले होते. दुथडी भरून वाहणारी सीना नदी, पाण्याखाली गेलेला नदीकाठचा परिसर आणि सर्वत्र दिसणारे पाणी हे त्यावेळचे चित्र होते. मात्र यंदाचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. ज्या सीना नदीने गतवर्षी महापुराचे दर्शन घडवले तीच सीना नदी आज अनेक ठिकाणी कोरडीठाक पडली आहे. नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह थांबला असून निवडक ठिकाणी असलेला पाणीसाठ्या मध्ये देखील घट झाली आहे. गतवर्षी पाण्याचा महापूर आणि यंदा पाण्याचा ठणठणाट, अशी विरोधाभासी परिस्थिती उदभवली गेली. एका वर्षात निसर्गाचा एवढा मोठा बदल कर्जत तालुक्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. कधी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, तर कधी पावसाअभावी पिके करपण्याची वेळ शेतकऱ्यांवर ठेपली आहे. निसर्गाच्या या अनिश्चिततेचा सर्वाधिक फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसला. मागच्या वर्षी ज्या पुराच्या पाण्याने भयावह परिस्थिती निर्माण केली होती यंदा पाण्याच्या प्रतीक्षेने त्याच माणसांची चिंता वाढवणारी आहे. निसर्गाच्या लहरीपणाची दोन्ही रूपे कर्जत तालुक्याने एकाच वर्षात अनुभवली.

जामखेड व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांवर कारवाईची मागणी

७ डिसेंबरला उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जामखेड शहर तसेच मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांविरोधात आणि तेथे सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे अहिल्यानगर जिल्हा युवा जिल्हाध्यक्ष सचिन दत्तात्रय आजबे यांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार उपोषणे करूनही स्थानिक पातळीवर कोणतीही दखल किंवा कायदेशीर कारवाई होत नसल्याचा आरोप करत त्यांनी आता थेट नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली असून, या निवेदनाची प्रत नाशिक परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनाही माहितीस्तव रवाना करण्यात आली आहे.

दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या या निवेदनात नमूद केले आहे की, जामखेड शहरातील व मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्र आणि तेथील अवैध प्रकारांविरोधात यापूर्वी तहसील कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक वेळा उपोषणे करण्यात आली. मात्र, अद्याप न्याय मिळालेला नाही किंवा ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

विभागीय आयुक्तांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कठोर व कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास येत्या ०७ डिसेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सचिन आजबे यांनी दिला आहे. तसेच, या काळात स्वतःच्या कुटुंबास काही विपरीत प्रकार घडल्यास किंवा जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित प्रशासन व कला केंद्र मालक जबाबदार राहतील.

वांबोरी चारीची पाईपलाईन पुन्हा फोडली; मढीचा पाणीपुरवठा ठप्प!

करडवाडीत जेसीबीने तोडफोड; पाणी चोरल्याचा आरोप; पाटबंधारे विभागाकडून गुन्हा दाखल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

तिसगाव : वांबोरी पाईप चारीच्या पाण्याची प्रतीक्षा तब्बल आठ वर्षांपासून करणाऱ्या मढी गावाला अखेर पाणी मिळण्यास सुरुवात झाली असतानाच करडवाडी शिवारात जेसीबीच्या साह्याने पाईपलाईन फोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी पुन्हा पाईपलाईन फोडण्यात आल्याने मढी तलावाकडे जाणारा पाणीपुरवठा बंद झाला. या घटनेत लाखो लिटर पाणी वाया गेले असून, काहींनी विद्युत मोटारी लावून पाणी विहिरी व शेततळ्यांमध्ये वळविल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी पाटबंधारे विभागाच्या शाखा अभियंत्यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, दोन व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वांबोरी पाईप चारीचे आवर्तन ४ नोव्हेंबर रोजी पिण्याच्या पाण्यासाठी सुरू करण्यात आले होते. तब्बल ५९ किलोमीटरचा प्रवास करून हे पाणी पाथर्डी तालुक्यातील योजनेतील शेवटचे गाव असलेल्या मढीपर्यंत पोहोचले. १४ नोव्हेंबर रोजी मढी तलावात पाणी दाखल झाले. मात्र, कमी दाबाने आणि तुटक स्वरूपात पाणी येत असल्याने १८ नोव्हेंबरपर्यंत केवळ १७ तास पाणी तलावात पोहोचले. दरम्यान, १६ नोव्हेंबरच्या रात्री कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता मढी तलावात पाणी सुरू नसल्याचे निदर्शनास आले होते.त्यातच १८



नोव्हेंबर रोजी सकाळी करडवाडी शिवारात जेसीबीच्या साह्याने सिमेंटची पाईपलाईन फोडण्यात आल्याचे उघड झाले. यापूर्वीही या ठिकाणी तीन वेळा पाईपलाईन फोडण्याचे प्रकार घडल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे.

पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेले. काही शेतकऱ्यांनी विद्युत मोटारी लावून वाहते पाणी विहिरी आणि शेततळ्यांमध्ये वळविल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.

पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता तुषार बबन गर्जे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १८ नोव्हेंबर रोजी सकाळी करडवाडी शिवारात वांबोरी पाईप चारीची पाहणी करताना पाईपलाईन फोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याचे आढळले. पप्पू बुधवंत (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) आणि त्याच्यासोबत असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने ही तोडफोड केल्याची माहिती ग्रामस्थांकडून मिळाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकारामुळे वांबोरी चारीचे सुरू असलेले आवर्तन विस्कळीत झाले असून पाणी वितरणावर परिणाम झाला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वांबोरी चारीचे ४५ दिवसांचे आवर्तन असून पाईपलाईन फोडल्यामुळे मढी गावाला अपेक्षित पाणी मिळालेले नाही.

त्यामुळे तातडीने पाईपलाईन दुरुस्त करून पूर्ण दाबाने पुढील दहा दिवस वाढीव पाणी द्यावे, तसेच मढी तलाव पूर्ण क्षमतेने भरून द्यावा, अशी मागणी मढी ग्रामस्थ आणि वांबोरी चारी कृती समितीने केली आहे.या मागणीसाठी विठ्ठल मरकड, भगवान मरकड, सचीन मरकड, देविदास मरकड, प्रदीप पाखरे, नाथा मरकड, अण्णा औटी, पोपट मोरे, अन्सार शेख, मनोज मरकड, अर्जुन मरकड, शाम मरकड, रामदास मरकड, आवेज शेख, उत्तम निमसे, ऋषिकेश मरकड, बाळासाहेब मरकड आदी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

दखल

इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी संदीप तापकीर; स्वागताध्यक्षपदी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे

मोशी : पाचव्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी इतिहास संशोधक व साहित्यिक संदीप भानुदास तापकीर यांची, तर स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ नगरसेवक डॉ.सुहास कांबळे यांची निवड करण्यात आली. इंद्रायणी साहित्य परिषदेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारिणी बैठकीत या निवडींवर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. परिषदेचे कार्याध्यक्ष सोपान खुडे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.



प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही २० डिसेंबर रोजी मोशी येथील जयगणेश सभागृहात हे साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनात नामवंत साहित्यिक, विचारवंत आणि साहित्यप्रेमींचा सहभाग असणार असून, विविध साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले संदीप तापकीर हे इतिहास संशोधक आणि साहित्यिक म्हणून परिचित आहेत. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांवर त्यांनी जिल्हानिहाय आठ पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या 'छत्रपती शिवराय' या मराठी शिवचरित्राचा हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेत अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. तसेच त्यांनी शंभरहून अधिक पुस्तकांचे संपादन केले आहे. स्वागताध्यक्ष डॉ.सुहास कांबळे हे प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ असून, मोशी येथील साईनाथ रुग्णालयाचे संचालक आहेत. संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. कला व साहित्याची विशेष आवड असलेल्या डॉ. कांबळे यांची यंदा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नगरसेवकपदी निवड झाली आहे.

शिरूरच्या लोकशाही लढ्याला कायदेतज्ज्ञांची नि:स्वार्थ साथ

कवठे येमाई : पुणे–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३-ऊवरील अपघातांचा धोका कमी करून रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी १८ ऑगस्ट २०२६ पासून शिरूर येथे सलग १३ दिवस लोकशाही मार्गाने आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान वाळुंज यांच्यासह इतर आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.या प्रकरणात घोडनदी (शिरूर) अतिरिक्त सत्र न्यायालयाने आंदोलकांचा अंतरिम जामीन कायम ठेवला आहे. या न्यायालयीन लढ्यात घोडनदी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. उदय सरोदे, ॲड. अभिषेक बाफना, ॲड. सौरव साठे, ॲड. स्वप्नील कापरे, ॲड. ऋषिकेश भागवत, ॲड. निखिल मांजरे, ॲड. अतुल खेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणताही मोबदला न घेता कायदेशीर सहकार्य केले. या वकिलांच्या सामाजिक योगदानाचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही कौतुक केल्याचे निलेश वाळुंज यांनी सांगितले.लोकशाहीत शांततामय आंदोलनाचा अधिकार असून सामाजिक उत्तरदायित्व जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, अशी भूमिका ॲड. उदय सरोदे यांनी मांडली. तर नागरिकांच्या जीवितसुरक्षेपेक्षा कोणतेही पद मोठे नसून जनहिताचा लढा सुरूच राहील, असा निर्धार निलेश वाळुंज यांनी व्यक्त केला.

कासारीतील गणेश मंदिरात काकडा आरतीचे स्वर

तळेगाव ढमढेरे : कासारी(ता.शिरूर) येथील तळेगाव ढमढेरे-न्हावरा रस्त्यालगत तळेगाव ढमढेरे, कासारी, टाकळी भिमा, निमगाव म्हाळूंगी या चार गावांच्या शिवेलगत असणाऱ्या 'गणपतीमाळ' येथील गणेश मंदिरात कोजागिरी पौर्णिमेपासून रोज पहाटे काकड आरतीचे स्वर घुमत आहे.

या गणेश मंदिरात गेली दहा ते पंधरा वर्षांपासून काकड आरतीची परंपरा जपली जात असून सुमधुर अभंग गायनाने परिसरातील वातावरण भक्तीमय होत आहे. पहाटे चार वाजता काकड आरतीला सुरुवात होते. यावेळी मंदिरासमोर रांगोळी काढली जाते.गणेश मुर्तीला पंचमृताने अभिषेक, स्नान घालुन तुळसीपानांचा व फुलांचा पुष्पहार अर्पण केला जातो. या काकड आरतीसाठी तळेगाव ढमढेरे, कासारी, माळवाडी, नरकेवाडी, टाकळी भिमा, निमगाव म्हाळूंगी,घोलपवाडी आदि परिसरातील आबालवृद्ध उपस्थित असतात. या महिनाभर चालत असणाऱ्या काकड आरती बरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

दुष्काळ : पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

पुणे जिल्ह्यात २ हजार १०३ शेतकऱ्यांचा सहभाग; १ हजार २०८ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यात १७ नोव्हेंबरपर्यंत २ हजार १०३ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग नोंदवला असून, १ हजार २०८.४९३ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. मागील रब्बी हंगामात ३ हजार ८६४ शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला होता. यंदा

तालुकानिहाय सहभागामध्ये इंदापूर तालुका आघाडीवर असून, येथे ६९९ शेतकऱ्यांनी ४४२.९४९५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. पुरंदरमध्ये ४७२ शेतकरी, शिरूरमध्ये ३७५, बारामतीमध्ये ३०८, आंबेगावमध्ये ८८, खेडमध्ये ७०, जुन्नरमध्ये ३५, दौंडमध्ये २३, भोरमध्ये २२ आणि हवेलीमध्ये ११ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

जिल्ह्यासाठी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

गहु बागायती, ज्वारी, हरभरा, उन्हाळी भुईमूग, रब्बी कांदा आणि रब्बी मका या अधिसूचित पिकांसाठी विमा संरक्षण उपलब्ध आहे. पिकानुसार विमा संरक्षित रक्कम व सहभागाची अंतिम मुदत वेगवेगळी असून, ज्वारी (जिरायत) पिकासाठी ३० नोव्हेंबर, तर ज्वारी (बागायत), गहु (बागायत), हरभरा, रब्बी कांदा व रब्बी मका पिकांसाठी १५ डिसेंबर ही अंतिम मुदत आहे. उन्हाळी भुईमुगासाठी ३१ मार्चपर्यंत सहभाग नोंदवता येणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, बँक खाते तपशील व जमीन धारणा उतारा आवश्यक आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेअंतर्गत १०० टक्के नोंदणी बंधनकारक असून, ती पूर्ण नसल्यास विमा प्रस्ताव रद्द होऊ शकतो. शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा कृषी विभागाच्या ु.ज्ञॲळीहळ. ारहरॲरीहींॲर.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

स्व. अजितदादा पवार हे कार्यकर्त्यांचे आणि सर्वसामान्यांचे अर्थसंकल्प': अनिल नागवडे

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

यवत : राज्याचा अर्थसंकल्प मांडणे म्हणजे केवळ जमा-खर्चाचे आकडे सांगणे नव्हे, तर पुढील वर्षात महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर किती पुढे न्यायचे याचे अचूक नियोजन करणे होय. स्व. अजितदादा पवार यांनी आपल्या कार्यकाळात हेच तत्व जपले. ते खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांचे आणि सर्वसामान्यांचे अर्थसंकल्प होते, अशा भावना अजितदादा प्रेमी अनिल नागवडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

पुणे जिल्हा परिषद येथे उभारण्यात आलेल्या स्व. अजितदादा पवार यांच्या अर्धपुतळ्याजवळ अभिवादन करताना सामाजिक कार्यकर्ते अनिल नागवडे यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला. अर्थसंकल्पाच्या निमित्ताने प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी अजितदादांच्या कार्यशैलीचे पैलू उलगडले.राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे केवळ जमा-खर्चाचे आकडे नसून महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर पुढे नेण्याचे नियोजन असते, हे तत्व स्व. अजितदादांनी जपले. त्यांच्या हातातील बजेटची बॅग ही संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाची स्वप्ने घेऊन जाणारी असायची. शेतकरी, रोजगार, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य या प्रत्येक घटकाचा ते बारकाईने विचार करत असत, असे अनिल नागवडे म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, मंत्रालयातील फायलींपेक्षा त्यांना गावागावातील सामान्य माणसाच्या अडचणींची जाण होती. तिजोरीतील प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी खर्च व्हावा, यासाठी ते आग्रही असत. वेळेचे पालन, कामाचा पाठपुरावा आणि प्रशासनावरील मजबूत पकड यामुळे अजितदादांचे नेतृत्व सदैव स्मरणात राहील.

खेळांमधुनही विद्यार्थ्यांना करिअर घडवता येते– ऐश्वर्या पाचर्णे

वढु बुद्रुकच्या माहेर संस्थेत हिवाळी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

तळेगाव ढमढेरे : शालेय विद्यार्थ्यांना खेळासाठी व्यासपीठ मिळणे गरजेचे असून खेळातून विद्यार्थ्यांचे करीअर घडत असल्याचे मत शिरुर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी व्यक्त केले.

वढु बुद्रुक ता. शिरुर येथील माहेर संस्थेत आयोजित हिवाळी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे बोलत होत्या, याप्रसंगी माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन, अध्यक्षा हिराबेगम मुल्ला, महाराष्ट्र केसरी पै. दिग्विजय भोंडवे, धनंजय पोकळे, विशाल शिवरकर, अंबर सातव, माजी ग्रामपंचायत सदस्य संजय भंडारे, डॉ. अभिजित बिरारी, सर्पमित्र शेरखान शेख, कवी आकाश भोरडे, माहेर संस्थेचे व्यवस्थापक रमेश दुतोंडे, विक्रम भुजबळ, मंगेश पोळ, आनंद सागर, योगेश भोर आदी मान्यवर उपस्थित होते. तर चार दिवस पार पडणाऱ्या स्पर्धेमध्ये विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा पार पडणार असून यावेळी महाराष्ट्र केसरी पै. दिग्विजय भोंडवे व माणुसकी चळवळचे प्रमुख राज देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर विद्यार्थ्यांमध्ये असलेले विविध गुण माहिती व्हावे आणि विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देता यावा या हेतूने माहेरच्या वतीने सदर क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जात असल्याचे माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश पोळ यांनी केले तर प्रास्ताविक विक्रम भुजबळ यांनी केले आणि रमेश दुतोंडे यांनी आभार मानले.



वढु बुद्रुक (ता. शिरुर) येथील माहेर संस्थेत हिवाळी क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे. (छायाचित्र आकाश भोरडे)

उरुळी कांचन ग्रामपंचायतीत विधी सेवा शिबिर उत्साहात

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

उरुळी कांचन (पुणे) : सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर हक्क, अधिकार आणि उपलब्ध न्यायव्यवस्थेची माहिती सहजपणे मिळावी, या उद्देशाने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ, उरुळी कांचन ग्रामपंचायत आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात विधी सेवा (लीगल एड) शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नागरिकांच्या कायदेशीर मदतीसाठी एमआयटी एडीटी 'स्कूल ऑफ लॉ'च्या विद्यार्थ्यांतर्फे आयोजन

या शिबिरात उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना विविध कायदेशीर तरतुदी, त्यांचे मूलभूत हक्क, न्याय मिळविण्याच्या प्रक्रिया आणि विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या कायदेशीर सहाय्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामस्थांनी आपले वैयक्तिक तसेच स्थानिक पातळीवरील कायदेशीर प्रश्न मांडले. त्यावर उपस्थित वकिलांनी प्रश्नांचे स्वरूप समजून घेत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केले. त्यामुळे नागरिकांना आपल्या कायदेशीर समस्यांबाबत योग्य दिशा मिळण्यास मदत झाली.

या कार्यक्रमाला उरुळी कांचनचे सरपंच मिलिंद टी. जगताप, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष आबासाहेब कांचन पाटील, ग्रामविकास अधिकारी पाटील, मोजणी अधिकारी सतिश कुदळे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व्हीजेएनटी सेलचे अध्यक्ष दिलीप गाडेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र टिळेकर, स्कुल ऑफ लॉ चे प्रभारी अधिष्ठाता डॉ.गोविंद राजपाल, प्रा.आदित्य केदारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉम धील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष व प्र.कुलपती प्रा.डॉ. मंगेश कराड यांच्या प्रेरणेने, तसेच सरपंच मिलिंद जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत कायदेशीर मार्गदर्शन पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि सरपंच मिलिंद जगताप यांचे आभार मानले.

हिंजवडी, माण, मारुंजी परिसरातील विकासकामांना गती द्या-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरातील वाढत्या नागरिकरणाच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापनाची कामे गतीने पूर्ण करावीत. विकासकाम ांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे निर्दे श जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत या परिसरातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

रस्ते विकासासाठी सुमारे ४५० कोटी रुपयांच्या प्रस्तावित कामांचे तांत्रिक सादरीकरण पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नोव्हेंबरअखेरपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आणि तांत्रिक बाबी अंतिम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

रस्त्यांच्या कामांच्या निविदा २५ नोव्हेंबरपर्यंत प्रसिद्ध करून २० डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. म ाण, मारुंजी आणि हिंजवडी परिसरातील रस्त्यांचे अलाइनमेंट, भूसंपादन, टीडीआर आणि डीपीआरसंदर्भातील अडचणी तातडीने दूर कराव्यात. रिंगरोडच्या काम ाला प्राधान्य देऊन मोजणी प्रक्रियेतील अडचणी सोडवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.



पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापनावर भर

परिसरातील गृहनिर्माण सोसायट्या आणि नागरिकांना होणारा पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था आणि सांडपाणी प्रक्रियेच्या प्रश्नांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित करणे, सांडपाण्याचा ओव्हरफ्लो रोखणे आणि पाण्याच्या स्रोतांचे योग्य नियोजन करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी अहवाल सादर करावेत. मुळशी धरण आणि संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले.

कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई करा

परिसरात उघड्यावर कचरा जाळणे तसेच प्रक्रिया न केलेले सांडपाणी नाले व नदीपात्रात सोडण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ग्रामपंचायत आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त पाहणी करून दोषींना नोटिसा बजावाव्यात. नियम ांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर आवश्यकतेनुसार कारवाई करावी. कचरा टाकण्याची ठिकाणे आणि प्रदूषणाची संभाव्य ठिकाणे निश्चित करून त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवावे, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

जाहिर नोटीस

माझे पक्षकार १) जयश्री अनिल भगत, वय ६३ वर्षे 2) प्राची अनिल भगत, वय ४२ वर्षे, 3) प्रसाद अनिल भगत, वय ३५ वर्षे, रा. भगत कॉम्प्लेक्स, 518 गणेश पेठ, कस्तुरे चौक, विठ्ठल मंदिराजवळ, पुणे 411002 यांनी दिलेल्या माहिती अधिकार आणि कोंगदपत्रा आधारे व त्यांच्या वतीने सर्व संबंधित व्यक्ती, शासकीय व निमशासकीय कार्यालये, पोलीस प्रशासन, बँका, वित्तीय संस्था, व्यावसायिक, व्यापारी तसेच सर्वसामान्य जनतेस ही जाहीर सूचना देण्यात येत आहे की,

माझ्या पक्षकारांची मुलगी सौ. रुचा जयेश बाफना (लग्नाआधिचे नाव कु. रुचा अनिल भगत), वय ४० वर्षे, सध्या रा. फ्लॅट क्र. बी-२०४, शंकेश्वर सोसायटी, प्राईड हॉस्पिटलच्या मागे, शांतीनगर, कात्रज रोड, कोंढवा, पुणे, यांचे विवाह श्री जयेश राजेश बाफना यांच्या सोबत ०६/०६/२०२५ ला झाला आहे.

सदर विवाह झाल्यापासून माझ्या पक्षकारांचा व त्यांची मुलगी सौ. रुचा जयेश बाफना याचा कोणत्याही प्रकारचा आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अथवा व्यावहारिक संबंध राहिलेला नाही. सौ. रुचा जयेश बाफना हा स्वतंत्रपणे त्याच्या पतीसह पुणे येथे वास्तव्यास असून, तो माझ्या पक्षकारांच्या पुणेयेथील निवासस्थानी राहत नाही तसेच त्याचे तेथे येणे-जाणे किंवा कोणताही संबंध नाही.

तसेच वापूर्वी वा यापुढे सौ. रुचा जयेश बाफना यांनी स्वत:च्या नावाने अथवा इतर कोणासमवेत कोणतेही आर्थिक व्यवहार, कर्ज, देणे-घेणे, मालमत्तेचे व्यवहार, बँक व्यवहार, जी.एस.टी., आयकर अथवा इतर कोणत्याही करासंबंधी बाबी, पोलीस प्रकरणे, दिवाणी अथवा फौजदारी न्यायालयीन प्रकरणे किंवा कोणतेही कायदेशीर अथवा बेकायदेशीर व्यवहार केले अथवा त्यांच्यावर कोणतेही दायित्व निर्माण झाले, तर त्यास माझे पक्षकार कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. अशा कोणत्याही व्यवहाराशी अथवा दायित्वाशी माझ्या पक्षकारांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. त्यामुळे सौ. रुचा जयेश बाफना यांचा शोध घेण्यासाठी, त्यांच्या देणी-घेणीबाबत, न्यायालयीन अथवा पोलीस प्रकरणांबाबत, कर अथवा इतर कोणत्याही व्यवहारासंदर्भात माझ्या पक्षकारांच्या पुणे येथील राहत्या घरी कोणीही येऊ नये, त्यांना कोणताही मानसिक, शारीरिक अथवा सामाजिक त्रास देऊ नये किंवा कोणत्याही प्रकारचा तगादा लावू नये. असे केल्यास त्यास संबंधित व्यवती स्वत: जबाबदार राहील.

ही जाहीर सूचना भविष्यात कोणताही गैरसमज निर्माण होऊ नये, तसेच सर्व संबंधितांच्या निदर्शनास सदर वस्तुस्थिती आणून देण्याच्या उद्देशाने माझ्या पक्षकारांच्या सूचनेनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे
दिनांक: 20/11/2026


करीता है जाहीर नोटीस,
मार्फत, ॲड. जय संतोष कोठारी
मो.7020118931

श्री जानाई देवी मंदिरातील साडेसात किलो चांदीच्या दागिन्यांची चोरी

चोरीचा छडा लवकर न लागल्यास भाविक व ग्राम स्थांकडून बेमुदत उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

कटफळ (ता: बारामती:) बारामती तालुक्यातील कटफळ गावचे ग्रामदैवत व हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र श्री जानाई देवी मंदिरात दिनांक २ नोव्हेंबर २०२६, वार सोमवार रोजी चोरीची गंभीर घटना घडली. या घटनेत अज्ञात चोरट्यांनी देवीच्या मंदिरातील सुमारे साडेसात किलो वजनाचे चांदीचे मौल्यवान अलंकार, ज्यामध्ये चांदीचे मखर, हार, टोप व इतर चांदीच्या वस्तूंचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.या घटनेमुळे कटफळ गावासह परिसरातील भाविकांमध्ये तीव्र नाराजी व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून ग्रामस्थांच्या श्रद्धेचे आणि परंपरेचे प्रतीक आहे. अशा पवित्र ठिकाणी चोरीची घटना घडणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याची भावना ग्राम स्थांनी व्यक्त केली आहे.



तपासाला गती देण्याची ग्रामस्थांची मागणी...!

सदर चोरीच्या घटनेप्रकरणी पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात आरोपींच्या विरोधात तपास सुरू असल्याची माहिती आहे. मात्र, घटना घडून अनेक दिवस उलटूनही चोरीचा ठोस छडा लागलेला नसल्याने ग्रामस्थ व मंदिर ट्रस्टींमध्ये नाराजी वाढत आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून चोरीस गेलेले चांदीचे दागिने तातडीने हस्तगत करावेत, तसेच या गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी म ागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार.....!

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकारी व प्रशासनाकडे ग्राम स्थ आणि मंदिर ट्रस्टींच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. मंदिरातील सुरक्षेच्या दृष्टीनेही आवश्यक उपाययोजना करण्याची म ागणी करण्यात येत आहे. सीसीटीव्ही फुटेज, घटनास्थळावरील पुरावे, संशयित हालचाली, तसेच चोरीच्या दागिन्यांच्या विक्रीच्या संभाव्य ठिकाणांची तपासणी अशा सर्व बाजूंनी तपास करण्यात यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

तपास न झाल्यास उपोषणाचा इशारा.....!

श्री जानाई देवी मंदिरातील चोरीच्या घटनेचा तपास तातडीने पूर्ण करून चोरीस गेलेले दागिने हस्तगत करण्यासाठी पोलिसांनी विशेष प्रयत्न करावेत. अन्यथा कटफळ येथील भाविक, ग्राम स्थ व मंदिर ट्रस्टी यांच्या वतीने लोकशाही म ार्गाने उपोषण आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

दुष्काळातही पक्ष्यांप्रती माणुसकीचा ओलावा!

जनसेविका वर्षा नाईक यांचा मुक्या जीवांसाठी संवेदनशील उपक्रम; समाजासमोर ठेवला माणुसकीचा आदर्श!

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

कवठे येमाई : यावर्षी एकीकडे वाढते तापमान,पाण्याची टंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात माणसांनाच पाणी मिळणे कठीण होत असताना, दुसरीकडे मुक्या पक्ष्यांची भूक आणि तहान ओळखून त्यांच्यासाठी पुढे सरसावणारे हातही समाजात आहेत. धनकवडी येथील पुण्याई नगर परिसरात वरिष्ठ जनसेविका तथा पोलीस मित्र संघाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्ष श्रीमती वर्षाताई नाईक यांनी अशाच माणुसकीचे दर्शन घडविले आहे.

पुण्याई नगर परिसरात मागील महिनाभरापासून भूक आणि तहानेने व्याकुळ होणाऱ्या कबुतरांसाठी वर्षाताई नाईक नियमि तपणे अन्न व पाण्याची व्यवस्था करीत आहेत.

माणुसकी केवळ माणसांपुरती मर्यादित नसावी; मुक्या जीवांनाही जगण्याचा अधिकार आहे! हा संदेश त्यांच्या कृतीतून समाजासमोर येत आहे. यावेळी वर्षाताई नाईक यांनी नागरिकांनाही विशेष आवाहन केले की, शहरातील पशू-पक्ष्यांसाठी आपल्या घराच्या गच्चीवर, खिडकीत किंवा परिसरात शक्य असेल त्या ठिकाणी पाण्याची भांडी ठेवावीत. भटक्या प्राण्यांसाठी चारा, अन्न आणि पाण्याची व्यवस्था करावी. उन्हाळा व पाणीटंचाईच्या काळात या छोट्याशा कृतीमुळे अनेक मुक्या जीवांचे प्राण वाचू शकतात.इतकेच नव्हे, तर रस्त्याने जाताना अडचणीत असलेले, भुकेलेले किंवा गरजू लोक दिसल्यास त्यांची आस्थेने विचारपूस करावी. शक्य असल्यास पैसे देण्याऐवजी त्यांना अन्न आणि पाणी देऊन मदतीचा हात पुढे करावा, असेही त्यांनी सांगितले.

उन्हाच्या झळा सोसणाऱ्या या मुक्या जीवांना अन्नाचा घास आणि पाण्याचा घोट मिळावा, या भावनेतून त्यांनी हा संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे.

दुसऱ्याच्या वेदना ओळखणारे मन आणि मदतीसाठी पुढे येणारे हात, हीच खरी समाजसेवा! वर्षाताई नाईक यांच्या या उपक्रमातून माणुसकीचा हाच जिवंत संदेश समाजाला मिळत असून, प्रत्येकाने आपल्या परीने मुक्या जीवांसाठी आणि गरजू माणसांसाठी संवेदनशीलतेने पुढे यावे, हीच या उपक्रमामागील भावना आहे.

जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, प्रेमनाथ रामगती चौहान मुक्काम पोस्ट विघ्नहर्ता बिल्डिंग फ्लॅट नं-२०१ गणेशनगर सुपर मार्केट बोपखेल पुणे ४११०३१

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन नंबर MH-14-JR-6839 असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सविता प्रेमनाथ चौहान यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .


दिनांक-२०/११/२०२६

श्रीमती सविता प्रेमनाथ चौहान
मुक्काम पोस्ट विघ्नहर्ता बिल्डिंग फ्लॅट नं-२०१ गणेशनगर सुपर मार्केट बोपखेल पुणे ४११०३१

श्रीगोंद्यात लग्नसराईवर पाणीटंचाईचे सावट!

मंगल कार्यालयांपासून केटरिंग व्यावसायिकांपर्यंत लगबग मात्र टँकरच्या पाण्याचा खर्च वाढवणार लग्नाचे बजेट!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : चातुर्मासाची सांगता आणि तुळशी विवाहानंतर आता लग्नसराईचा हंगाम सुरू होत आहे. नोव्हेंबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत पंचांगानुसार तब्बल ५८ विवाह मुहूर्त असल्याने श्रीगोंदा तालुक्यात मंगलकार्यांची लगबग वाढण्याची चिन्हे आहेत. मंगल कार्यालये, केटरिंग व्यावसायिक, फुलविक्रेते, फोटोग्राफर, सराफ आणि कापड व्यावसायिकांना या लग्नसराईत मोठ्या उलाढालीची अपेक्षा आहे. मात्र, दुसरीकडे तालुक्यातील ग्रामीण भागावर पाणीटंचाईचे सावट असल्याने यंदाची लग्नसराई खर्चाच्या गणितात अडकण्याची शक्यता आहे.

लग्न म्हटले की पाहुण्यांची गर्दी, जेवणावळी, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर व्यवस्था आलीच. मात्र, ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवू लागल्यास मंगल कार्यालयांसह घरगुती विवाह सोहळ्यांनाही पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरने पाणी विकत घेण्याची वेळ आली तर लग्नाच्या बजेटमध्ये आणखी भर पडणार आहे. एकीकडे शेतीतील उत्पन्नाची अनिश्चितता आणि दुसरीकडे वाढता महागाईचा खर्च यामुळे शेतकरी कुटुंबांसमोर लग्नकार्याचे नियोजन करताना मोठे आव्हान उभे राहणार आहे.

बाजारपेठेत लगबग; शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री!

५८ मुहूर्तांमुळे बाजारपेठेला चांगल्या व्यवसायाची आशा आहे. कपडे, सोने-चांदी, फर्निचर, भांडी, वाहन व्यवस्था, मंडप, सजावट आणि केटरिंग व्यवसायाला चालना मिळणार आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीचा फटका शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक क्षमतेला बसल्यास मोठ्या खर्चाच्या विवाह सोहळ्यांऐवजी साध्या पद्धतीने विवाह करण्याकडे कल वाढू शकतो.

त्यामुळे यंदा लग्नसराईत थाटापेक्षा काटकसरीला अधिक महत्त्व मिळण्याची शक्यता आहे.

मुहूर्त भरपूर, पण पाण्याचे काय?

लग्नासाठी तारीख निश्चित करणे सोपे असले तरी पाहुण्यांसाठी पिण्याचे पाणी, जेवणावळी आणि स्वच्छतेची व्यवस्था करणे आयोजकांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

श्रीगोंदा तालुक्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास विवाह सोहळ्यांच्या आनंदावर पाण्याचा प्रश्न सावली धरू शकतो. त्यामुळे मंगल कार्यालयांनी पाण्याचे नियोजन आतापासूनच करणे गरजेचे आहे.लग्नाचा बार उडणार, पण पाण्याची सोय कोण करणार? हा प्रश्न यंदाच्या लग्नसराईत श्रीगोंदा तालुक्यातील आयोजकांसमोर महत्त्वाचा ठरणार आहे.

दुष्काळावर मात करायची असेल तर पाणी वापर संस्था बळकट करा : लक्ष्मीकांत वाघवकर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : दुष्काळावर मात करण्यासाठी पाणी वापर संस्था बळकट करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे आणी या संस्था बळकट झाल्यास पाण्याचा थेंब ना थेंब वाया न जाता संस्था कार्यक्षमपणे कार्यरत होतील असा विश्वास पाणी वापर संस्थांचे मार्गदर्शक लक्ष्मीकांत वाघवकर यांनी केले आहे. नाशिक येथे पाटबंधारे विभागाचे अधिकारी व पाणी वापर संस्थाचे राज्यातील पदाधिकारी यांची संयुक्त पाणी परिषद घेण्यात आली यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष शहाजीदादा सोमवंशी , उपाध्यक्ष हिरालाल मेंडीगिरी , सचिव माणिकराव पाटील, कोषाध्यक्ष

शशिकांत भोरे, अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धणे आदी तसेच पारनेर तालुक्यातील शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्थेचे कार्याध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वनाथ येवले , पांडुरंग डुकरे तसेच पदाधिकारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थीतांनी पाण्याचे महत्त्व विशद करताना सांगितले की दुष्काळी परिस्थितीत पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. यासाठी शेतकऱ्यांनी पाणी वापर संस्था मजबूत करण्यासाठी सहकार्य करण्याची गरज आहे. यासाठी नियमित पाणी पट्टी तसेच पाण्याची वाढती मागणी करण्याची गरज आहे. शिवनेरी वितरीकास्तरीय शिखर पाणी वापर संस्थेचे कार्याध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वनाथ येवले यावेळी या पाणीपरिषदेबाबत बोलताना म्हणाले की शेतकरी सहभागी सिंचन शिखर संस्था महाराष्ट्र राज्य ही महाराष्ट्रातील सर्व पाणी वापर संस्थाची प्रतिनिधी स्वरूपात संस्था आहे. या मध्ये शासनातील क्लास वन, सुपर क्लास वन अधिकारी आहेत तसेच सिंचन क्षेत्रातील मधील तज्ञ माणसे आहेत. शिवनेरी वितरिका स्तरीय पाणी वापर संस्था महासंघ सदस्य संस्था असल्याने या संस्था मध्ये संपूर्ण महाराष्ट्र मधून एकोणीस सदस्य आहेत. ही संस्था पाणी वापर संस्थांच्या अडी अडचणी महाराष्ट्र सरकारकडे सोडविण्यासाठी तयार केली आहे. संस्था कार्यालय सिंचन भुवन , त्र्यंबक रोड नासिक येथे आहे. कुकडी प्रकल्प मधून आम्ही व पांडुरंग डुकरे यांना निमंत्रण होते . त्यामुळे गेलो होतो. या राज्यस्तरीय पाणी परिषद माध्यमातून मार्गदर्शन मिळत असल्याने या परिषदेसाठी उपस्थित राहण्याचा योग आला असल्याची माहिती येवले यांनी दिली आहे.

द•ख•ल

सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास : खा. लंके



निघोज : सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास झाला असून पतसंस्था चळवळ असो की बँक चळवळ ही सर्वसामान्य जनतेच्या विकासाची जननी असून सहकारी चळवळीला पाठबळ देण्यासाठी आपण कार्यरत राहणार असल्याची माहिती खासदार व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक निलेश लंके यांनी दिली आहे. निघोज परिसरातील वडगाव गुंड ग्रामस्थ तसेच श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्था वतीने खासदार निलेश लंके यांची जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लंके, उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड, माजी उपसरपंच बाबाजी लंके, भिवाजीशेठ गुंड, सत्यवान गुंड, विजय लंके, प्रशांत लंके, भागुजी गुंड यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार लंके म्हणाले जिल्ह्यातील जनतेचा आपल्या कामावर विश्वास आहे म्हणून आपण सर्वसामान्य असूनही धनशक्तीपुढे निवडून आलो आहे. आपल्याला जिल्हा बँकेपासून दूर ठेऊन पारनेरच्या जनतेला झुलवत ठेवण्याचे काम बाह्यशक्तीने केले मात्र पारनेरची जनता स्वाभिमानी आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सहकारी चळवळीत जिल्हा बँक अग्रेसर आहे. मात्र शेतकऱ्यांना सर्वाधिक कर्जपुरवठा केला गेला पाहिजे. शेतकऱ्यांच्या मुलांना उद्योग व्यवसायासाठी जिल्हा सहकारी बँकेने कर्ज देण्याची गरज आहे ही आपली प्रामुख्याने मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

ओंकार भोर व वैष्णवी मोरे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



निघोज : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धेत समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी व समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेल्हे च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचा विद्यार्थी ओंकार भोर याने शुद्ध विज्ञान गटात, तर समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची विद्यार्थिनी वैष्णवी मोरे हिने कृषी व पशुसंवर्धन गटात तृतीय क्रमांक पटकाविला. या दोन्ही विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' स्पर्धेमध्ये विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपापले संशोधनात्मक प्रकल्प सादर करून सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला, नावीन्यपूर्ण संकल्पनांना तसेच विविध क्षेत्रांतील समस्यांवर संशोधनाच्या माध्यमातून उपाय शोधण्याच्या क्षमतेला प्राधान्य देण्यात आले. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल वसंतराव शेळके, माऊली शेळके, विवेक शेळके, वल्लभ शेळके, स्नेहल शेळके, राजीव सावंत, डॉ. कुलदीप रामटेके, डॉ. संतोष घुले, प्रा. प्रदीप गाडेकर, डॉ. शरद पारखे, ओंकार भोर व वैष्णवी मोरे यांचे अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

रांजणी शाळेच्या वाचनालयास पुस्तकांची भेट

दहिगाव- ने : रांजणी (ता. शेवगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील ज्ञानाची व्याप्ती वाढावी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शाळेच्या कुसुमाग्रज वाचनालयास पाच हजार रुपये किमतीची विविध प्रकारची वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली. लोकनियुक्त सरपंच काकासाहेब घुले यांनी कन्या सौ. स्नेहल प्रकाश आठरे हिच्या जन्म दिनाचे औचित्य साधून हा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविला. अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाची सवय लागावी, गोष्टी, चरित्रे, प्रेरणादायी साहित्य तसेच विविध ज्ञानवर्धक पुस्तकांच्या माध्यमातून त्यांच्या विचारांना चालना मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. पुस्तके ही माणसाची खरी मित्र असून, वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि बौद्धिक क्षमतेला चालना मिळते असे यावेळी सरपंच काकासाहेब घुले यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे शाळेतील वाचनालय अधिक समृद्ध होण्यास मदत होणार असल्याचे मुख्याध्यापक मोहन पाऊलबुध्दे यांनी म्हटले. सदर पुस्तके सरपंच काकासाहेब घुले, माजी सरपंच अरुण थोरात, डॉ. विजय घुले आणि शिक्षक यांच्या उपस्थितीत शाळेकडे सुपूर्द करण्यात आली.

सकल मराठा समाज कर्जत तालुक्याच्या प्रमुख समन्वयकपदी बंटी यादव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



कर्जत : सकल मराठा समाज कर्जतच्या प्रमुख समन्वयकपदी निलेश उर्फ बंटी यादव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंगळवारी कर्जत जिल्हा परिषदेच्या शाळेत सकल मराठा समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात बंटी यादव यांच्या नावावर एकमत होत मावळते समन्वयक रावसाहेब धांडे यांनी सर्व शिवप्रेमींच्या उपस्थितीमध्ये सदरची निवड जाहीर केली.

मंगळवार, दि १७ रोजी सकल मराठा समाज कर्जतची बैठक कर्जतच्या जिल्हा परिषद शाळेत संपन्न झाली. यात आगामी काळासाठी कर्जत सकल मराठा समाजाच्या प्रमुख समन्वयकपदी बहिरोबावाडीचे बंटी यादव यांच्या नावावर सर्व शिवप्रेमींनी एकमत ठरवले. मावळते समन्वयक रावसाहेब धांडे यांनी सर्वांच्या उपस्थितीमध्ये बंटी यादव यांची निवड जाहीर करताच जल्लोष करण्यात आला. यावेळी सकल मराठा समाज कर्जतच्यावतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नूतन समन्वयक बंटी यादव यांचा फेटा बांधत सन्मान करण्यात आला. यावेळी सत्कारास उत्तर देताना यादव म्हणाले की, आगामी काळात होणारा शिवजयंती उत्सव सर्वाना सोबत घेत विविध सामाजिक उपक्रम राबवत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून यासह मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर सर्व समाज बांधवांसोबत न्यायिक मार्गाने लढा उभारण्यात येईल अशी ग्वाही दिली.

कामरगावमध्ये वन्यजीवांसाठी पाणवठ्यांमध्ये पाणी सोडण्याचा उपक्रम!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : जिल्हा बँकेचे चेअरमन तथा माजी खासदार सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कामरगाव येथे सुजयदादा विखे पाटील विचार मंचाच्या वतीने 'सुजय दादा पंधरवडा' या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत आज अहिल्यानगर शहराचे उपमहापौर धनंजय भैय्या जाधव, भाजपचे पारनेर तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे आणि भाजपचे उपजिल्हाप्रमुख मनोज ठोकळ,दुध संघाचे चेअरमन दत्ता नाना पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत वन्यजीवांसाठी उभारण्यात आलेल्या पाणवठ्यांमध्ये पाणी सोडण्यात आले.

सध्याच्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे जंगल परिसरातील नैसर्गिक जलस्रोत आटले असून, पाण्याच्या शोधात बिबट्यासह इतर वन्यप्राणी मानवी वस्तीकडे येत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन वन्यजीवांची तहान भागविण्यासाठी लोकसहभागातून दर आठवड्याला २५ ते ३० हजार लिटर पाणी उपलब्ध करून देण्याचा विचार मंचाचा संकल्प आहे. सध्या कामरगावमध्ये दोन पाणवठे कार्यान्वित झाले असून, येत्या दोन ते तीन दिवसांत आणखी दोन पाणवठे सुरू करण्यात येणार आहेत. केवळ वाढदिवस साजरा न करता तो समाजोपयोगी उपक्रमांतून साजरा करण्याचा संकल्प या पंधरवड्याच्या माध्यमातून करण्यात आला आहे. यामध्ये वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था, गोशाळेतील गायींसाठी चारा वाटप, वयोश्री योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक साहित्य वाटप तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचा समावेश आहे.

यावेळी सो.चेअरमन सुदाम ठोकळ, सिद्धांत आंधळे, मा.सरपंच तुकाराम कातोरे,मा. चेअरमन शिवाजी साठे, संदीप लष्करे,ख.वि.संघाचे संचालक लक्ष्मण ठोकळ, प्रा. मारुती आंधळे सर,पोपट साठे,राजेंद्र ठोकळ मेजर,भरत साळी, आदिनाथ लाळगे,भरत कातोरे,गोरख ठोकळ, अनिल ठोकळ, उद्योजक प्रदीप साठे, जगन्नाथ ठोकळ, अरुण पानसरे, ओम राजगुरू,सोहम आंधळे यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

संस्कार बाल आश्रम व आजोळ वृद्धाश्रमाला 'मातोश्री पुष्पा नथानी पुरस्कार २०२६' प्रदान!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : समाजातील अनाथ, निराधार बालकांना आधार देतानाच निराधार ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या राशीन येथील जनजागृती सामाजिक युवा प्रतिष्ठान संचलित संस्कार बाल आश्रम व आजोळ वृद्धाश्रम यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत सन २०२६ चा प्रतिष्ठित 'मातोश्री पुष्पा नथानी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे संस्थेच्या सेवाभावी कार्याचा गौरव झाला असून राशीनच्या सामाजिक क्षेत्रातून या यशाचे कौतुक होत आहे.

नाम फाउंडेशनचे संस्थापक तथा प्रसिद्ध विनोदी अभिनेते श्री. मकरंद अनासपुरे आणि रेलफॉर फाउंडेशनचे संस्थापक श्री. दीपक नथानी यांच्या शुभहस्ते, तसेच रेलफॉर फाउंडेशनचे उडठ प्रमुख श्री. नितीन घोडके आणि उपस्थित मान्यवरांच्या सन्माननीय उपस्थितीत हा पुरस्कार स्वीकारण्यात आला. संस्थेच्या वतीने शरदचंद्र आढाव यांनी हा सन्मान स्वीकारला.

अनाथ आणि निराधार बालकांना मायेची ऊब, सुरक्षित निवारा, शिक्षण आणि संस्कार देण्याबरोबरच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना आधार, आपुलकी आणि सन्मानाने जगण्याचे बळ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्था सातत्याने करीत आहे. केवळ मदत करण्यापुरते मर्यादित न राहता माणुसकीचे नाते जपण्याचा संस्थेचा प्रयत्न या पुरस्काराच्या माध्यमातून अधोरेखित झाला आहे.

स्मृति चिन्ह, १० लाख रुपयाचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते...

या पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना शरदचंद्र आढाव यांनी संस्थेच्या कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे योगदान देणारे सर्व देणगीदार, हितचिंतक, शुभचिंतक आणि सेवाभावी सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा पुरस्कार केवळ संस्थेचा वैयक्तिक सन्मान नसून समाजसेवेच्या कार्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाच्या निःस्वार्थ सेवाभावाचा आणि सहकार्याचा गौरव असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ग्रामपंचायतचे कामे पूर्ण करूनही मोबदला मिळाला नाही; कंत्राटदाराने दिली कायदेशीर नोटीस

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

खरवंडी कासार : पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार ग्रामपंचायतची दोन विकासकामे पूर्ण करूनही मोबदला मिळाला नसल्याने कंत्राटदाराने आता कायदेशीर नोटीस बजावली आहे. ग्रामपंचायतीकडे एकूण रु. ४,३४,२५०/- थकित असून नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत व्याजासह रक्कम न दिल्यास दिवाणी व फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा नोटीसीत देण्यात आला आहे.

कंत्राटदार प्रमोद बबनराव अंदुरे, रा. खरवंडी कासार यांच्यावतीने ॲड. सचिन गुजाबा आघाव, अहिल्यानगर यांनी ही नोटीस पाठवली आहे. नोटीस जिल्हाधिकारी, अहिल्यानगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी, प्रशासक व ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत खरवंडी कासार यांना बजावण्यात आली आहे.

प्रमोद अंदुरे हे गेल्या ३ वर्षांपासून शासकीय कंत्राटदार म्हणून काम करत आहेत. त्यांना खरवंडी कासार ग्रामपंचायतीकडून दोन कामांचे कार्यादेश मिळाले होते. १. मारुती मंदिर ते लेंडी ओढा पर्यंत बंदिस्त गटार, हे काम विहित मुदतीत पूर्ण करण्यात आले. डेप्युटी इंजिनिअर, पंचायत समिती पाथर्डी यांनी दि. २०/०९/२०२६ रोजी काम पूर्ण झाल्याचा दाखला दिला आहे. या कामाचा मोबदला रु. २,३४,२५०/- थकित आहे. २. रामतीर्थ स्मशानभूमी येथे बोअरवेल, पंप बसवणे व पाणी पुरवठा, हे कामही विहित मुदतीत पूर्ण करण्यात आले. दि. २९/०५/२०२६ रोजी काम पूर्ण झाल्याचा दाखला देण्यात आला आहे. या कामाचा मोबदला रु. २,००,०००/- थकित आहे. दोन्ही कामांसाठी जेसीबी, पेव्हर ब्लॉक, सिमेंट, पाईप, मजुरी यावर मोठा खर्च करावा लागला. तरीही वारंवार पाठपुरावा करूनही पैसे दिले गेले नाहीत. उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नोटीसीत करण्यात आला आहे. यामुळे कंत्राटदाराचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

१५ दिवसांची मुदत, १८ टक्के व्याजाची मागणी

नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत रु. ४,३४,२५०/- ही रक्कम द.सा.द.शे. १८ टक्के व्याजासह अदा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नोटीस खर्च रु. ५,०००/- देखील मागण्यात आला आहे. मुदतीत पैसे न दिल्यास सक्षम न्यायालयात दिवाणी व फौजदारी कारवाई केली जाईल, असे नोटीसीत स्पष्ट करण्यात आले आहे. या नोटीसीमुळे खरवंडी कासार ग्रामपंचायतीतील थकबाकीचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. ग्रामपंचायत प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

कर्जमाफी झाली; पण सहा महिन्यांच्या व्याजाचा फास शेतकऱ्यांच्या गळ्यात?

सरकारने ८ सप्टेंबरला पैसे दिले; ३१ मार्च ते ८ सप्टेंबरदरम्यानचे व्याज थकीत! सहकारी संस्थांचा तोटा कोण भरून काढणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळाला खरा; मात्र या कर्जमाफीच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या सहा महिन्यांच्या व्याजाचा पेच आता श्रीगोंदा तालुक्यातील सहकारी संस्थांसमोर उभा राहिला आहे. शासनाकडून कर्जमाफीची रक्कम उशिरा प्राप्त झाल्याने ३१ मार्च २०२६ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीतील व्याजाचा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. विशेष म्हणजे, सहकारी संस्थांनी ३१ मार्चपर्यंतची रक्कम शासनाकडे भरली होती. त्यानंतर शासनाकडून ८ सप्टेंबर रोजी कर्जमाफीची रक्कम संस्थांना प्राप्त झाली.

असे कोणतेही व्याज कर वसूल करू नये त्याबाबत शासनाचे परिपत्रक आहे जिल्हा निबंधक मंगेश सूरवसे

कर्जमाफी मंजूर झाल्यावर शासनाकडून बँकेत पैसे जमा होण्यास विलंब झाल्यास, त्या मधल्या कालावधीचे व्याज कर्जदाराकडून (शेतकऱ्याकडून) वसूल करता येत नाही. त्यामध्ये शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत अशी माहिती जिल्हा निबंधक मंगेश सुरवसे यांनी बोलताना दिली आहे

या मधल्या कालावधीतील व्याजाचा भार मात्र नेमका कोण उचलणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

संस्थांनी शासनाला रक्कम भरली, त्याची परतफेडही झाली; मात्र सहा महिन्यांचे व्याज संस्थांना मिळाले नसल्याने आर्थिक नुकसान सहन करण्याची वेळ आली आहे. हे व्याज शेतकऱ्यांनी भरायचे की शासनाने द्यायचे, याबाबत स्पष्टता नसल्याने संभ्रम कायम आहे. दुसरीकडे, बँकेने संबंधित व्याजाची वसुली केली असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या माथी बसलेला हा आर्थिक बोजा भरून काढण्यासाठी काही संस्थांकडून ठराव करून सहा महिन्यांच्या व्याजाची मागणी केली जात असल्याची चर्चा आहे.

मात्र या गंभीर प्रश्नावर शेतकरी, संस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि संचालक मंडळ यांच्याकडून ठोस भूमिका मांडली जात नसल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांकडून व्याज मागायचे तर कर्जमाफीचा उद्देश काय? आणि शासनाकडून व्याज मिळत नसेल तर संस्थांचा तोटा कोण भरून काढणार? असा दुहेरी पेच निर्माण झाला आहे. सहकार विभाग आणि शासन याबाबत नेमकी काय भूमिका घेणार, तसेच सहा महिन्यांच्या व्याजाची जबाबदारी कोण स्वीकारणार, याकडे श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. कर्जमाफीचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला; पण त्यातून निर्माण झालेल्या व्याजाच्या पेचात सहकारी संस्था अडकल्या. आता या आर्थिक नुकसानीची भरपाई कोण करणार, हा खरा सवाल आहे!

सहा महिन्यांच्या व्याजाची जबाबदारी कोणाची?

- ३१ मार्च २०२६ पर्यंत संस्थांनी शासनाकडे रक्कम भरली.
- ८ सप्टेंबर २०२६ रोजी शासनाकडून कर्जमाफीची रक्कम प्राप्त झाली.
- मधल्या सहा महिन्यांच्या व्याजाचा प्रश्न कायम.
- बँकेने व्याज वसूल केल्याची माहिती.
- संस्थांचा आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी ठरावांचा आधार.
- शासन, सहकार विभाग की शेतकरी; जबाबदारी नेमकी कोणाची?

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.२० नोव्हेंबर २०२६ । पान ८

मालुंजा येथे शेतातील खत आणि कापसाची चोरी; घरफोडीचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी तालुक्यातील मालुंजे येथे शेतातील पत्र्याच्या शेडची खिडकी उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत खताच्या गोण्या आणि कापूस असा एकूण १७ हजार ३४० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मालुंजे येथील बाळासाहेब कारभारी झारेकर (वय ४६) यांच्या शेतातील गट क्रमांक १६२ मधील पत्र्याच्या शेडमध्ये खताच्या गोण्या व कापूस ठेवण्यात आला होता. दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी६ वाजेपासून ते १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने या शेडला लक्ष्य केले.चोरट्याने शेडच्या पत्र्याच्या खोलीच्या खिडकीचे नट काढून पत्रे बाजूला करून आत प्रवेश केला. त्यानंतर आरसीएफ कंपनीचे १५-१५-१५ खत, रामसुफल कंपनीचे सुपर फॉस्फेट खताच्या दोन गोण्या तसेच चार गोण्यांमधील अंदाजे १०० किलो कापूस असा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी बाळासाहेब झारेकर यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

जिल्हा बँकेचा कारभार शेतकरी केंद्रित करणार : डॉ. सुजय विखे पाटील



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. सुजय विखे पाटील यांनी आज अधिकृतपणे स्वीकारली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी बँकेच्या आगामी कामकाजाची दिशा स्पष्ट करताना शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली. बँकेचा कारभार अधिक सक्षम, पारदर्शक आणि शेतकरीकेंद्रित करण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. पदभार स्वीकारल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, तातडीने लोकप्रिय निर्णय घेण्यापेक्षा प्रथम बँकेची आर्थिक परिस्थिती, सध्याचे कामकाज आणि उपलब्ध योजनांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यानंतर बँकेच्या प्रगतीला पूरक आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील. शेतकऱ्यांसाठीच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पुणे आणि मुंबई जिल्हा सहकारी बँकांच्या कामकाजाचा तसेच त्यांच्या विविध उपक्रमांचा अभ्यास केला जाणार आहे. या बँकांमधील चांगल्या योजनांचा अवलंब करून जिल्हा बँकेच्या कामकाजात आवश्यक सुधारणा केल्या जातील.

बँकेच्या नामकरणाबाबत बोलताना त्यांनी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेऐवजी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले. यासाठी रिझर्व्ह बँकेशी संबंधित तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत चर्चा केली जाणार आहे. ऊसदराच्या प्रश्नावर भूमिका स्पष्ट करताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, शेतकरी संघटनेच्या मागण्या आणि भूमिका समजून घेतल्या आहेत. शेतकऱ्यांना उसाचा योग्य दर मिळावा आणि त्याचवेळी सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक गणितही बिघडू नये, यासाठी समन्वयातून मार्ग काढला जाईल. आगामी दुष्काळी परिस्थिती आणि साखर कारखान्यांसमोरील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन सर्व घटकांच्या हिताचा विचार करणे आवश्यक आहे.

जिल्हा सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम आर्थिक सुविधा उपलब्ध करून देणे, योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविणे आणि संस्थेची आर्थिक घडी अधिक मजबूत करणे, याला आगामी काळात प्राधान्य राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आईसमोरून अल्पवयीन मुलीचे अपहरण

राहुरी तालुक्यातील घटना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : घराजवळ भांडी घासत असलेल्या १७ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे तिच्या आईसमोरून मोटारसायकलवर आलेल्या तरुणाने अपहरण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील केंदळ परिसरात १७ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, १७ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास मुलगी घराजवळ भांडी घासत होती. त्यावेळी घराच्या पाठीमागे मोटारसायकल आल्याचा आवाज ऐकून आई बाहेर आली. मात्र, मुलगी जागेवर दिसली नाही. तिने घराच्या पाठीमागे जाऊन पाहिले असता आकाश संजय बर्डे (रा. ममदापूर, ता. राहाता) हा मुलीला मोटारसायकलवर बसवून घेऊन जात असल्याचे दिसले.

मुलीच्या नातेवाइकांनी मोटारसायकलचा पाठलाग केला; मात्र तो मिळून आला नाही. आकाश बर्डे याने मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत आईने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आकाश संजय बर्डे याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १२९१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

पुतण्यानेच मारला काकूच्या दागिन्यावर डल्ला ; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : पुतण्याने काकूच्या दागीण्यांवर डल्ला मारुन काकूने घरात ठेवलेले दहा तोळे सोन्याचे दागीने पुतण्याने चोरुन नेले. ही घटना राहुरी तालुक्यातील उंबरे येथे उघडकीस आली. आरोपी पुतण्यावर राहुरी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. संगीता शिवाजी शिरसाठ, वय ४० वर्षे, रा. उंबरे, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, संगिता शिरसाठ यांच्याकडे वेळोवेळी खरेदी केलेले दहा तोळे सोने होते. दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास संगिता शिरसाठ यांनी घरातील साफ सफाई करुन त्यांच्याकडे असलेले सोन्याची दागीने किचनमध्ये असलेल्या लॅप्टवर पातेल्याखाली बॉक्समध्ये ठेवले होते. त्यानंतर दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजे दरम्यान संगिता शिरसाठ यांना कार्यक्रमा निमीत्त बाहेरगावी जायचे असल्याने सोने घालायचे होते. तेव्हा त्यांनी घरामध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने पाहीले असता ते मिळुन आले नाहीत. त्यांनी दागीन्यांचा घरामध्ये शोध घेतला परंतु ते मिळुन आले नाही. दरम्यान आरोपीने संगिता शिरसाठ यांचे राणीचा हार, एक मोठे गंठण, एक मिनी गंठण तसेच कानातील झुंबर असे १० तोळ्याचे सोन्याचे दागीने चोरुन नेले. संगिता शिरसाठ यांचा पुतण्या वैभव शिरसाठ हा त्यांच्या घरी खुप वेळा ये जा करत असल्याने सोन्याचे दागीने त्यानेच चोरुन नेले आहेत, असा संगिता शिवाजी शिरसाठ यांना संशय आहे. त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी पुतण्या वैभव बापुसाहेब शिरसाठ, रा. उंबरे, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. १२७३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

लग्नास नकार दिल्याने महाविद्यालयीन तरुणीला धमकी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : लग्न करण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका तरुणाने महाविद्यालयीन तरुणीला शिवीगाळ करून धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यात घडली. 'माझ्याशी लग्न केले नाही तर तुझे दुसऱ्या कोणाशीही लग्न होऊ देणार नाही. तसेच तुझे छायाचित्र इन्स्टाग्रामवर टाकून बदनामी करीन,' अशी धमकी दिल्याप्रकरणी राहुरी पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत २१ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली आहे. तरुणी आणि आरोपी श्रीकांत संजय नेहे (रा. कोल्हार खुर्द, ता. राहुरी) हे दहावीपर्यंत एकाच शाळेत शिकत होते. गेल्या सहा महिन्यांपासून आरोपी तरुणी महाविद्यालयात किंवा अन्य ठिकाणी गेली असता तिचा वारंवार पाठलाग करीत होता. याबाबत तरुणीने आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी आरोपी व त्याच्या पालकांना समज दिली होती. त्यावेळी त्याने पुन्हा त्रास देणार नसल्याचे सांगितले होते. मात्र, १० नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता तरुणी कोल्हार येथे खरेदी करून घरी जात असताना आरोपीने तिचा पाठलाग केला. यावेळी तरुणीने जाब विचारला असता त्याने लग्नाची मागणी घातली. तरुणीने नकार दिल्यानंतर त्याने शिवीगाळ करून वरीलप्रमाणे धमकी दिली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२६३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२), ३५२ व ७८(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

शेवगाव तालुक्यात गुटखा विक्रेत्यांवर स्थानिक गुन्हे शाखेचे दोन छापे; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची विक्री करणाऱ्यांविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. शेवगाव तालुक्यातील कऱ्हेटाकळी आणि कांबी येथे दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी एकूण ६ हजार ९८८ रुपये किमतीचा गुटखा व संबंधित मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. कऱ्हेटाकळी येथे रफिक अहमद शेख (वय २२) याच्याकडून ४ हजार ३४८ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व संबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९४३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. तर कांबी येथे प्रशांत दिगंबर राजपूत (वय ३२) याच्याकडून २ हजार ६४० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९४४/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शेवगाव तालुक्यात प्रतिबंधित गुटख्याची विक्री आणि साठवणूक रोखण्यासाठी पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. मात्र, किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करण्याबरोबरच प्रतिबंधित गुटखा नेमका कुठून येतो, त्याचा पुरवठा कोण करतो आणि या व्यवसायामागील मोठे वितरक कोण आहेत, याचाही शोध घेण्याची गरज आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

ममदापूर परिसरात बिबट्या जेरबंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

ममदापूर : राहाता तालुक्यातील ममदापूर येथील गावालगत असलेल्या पठाण वस्ती परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वाढता वावर असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याच्या दर्शनामुळे शेतकरी, मजूर, महिला, लहान मुले तसेच पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. अखेर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट्या जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

ममदापूर परिसरात बिबट्याचा वावर असल्याच्या तक्रारी आणि नागरिकांच्या मागणीनंतर वनविभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता. गुरुवारी संध्याकाळी हा पिंजरा लावण्यात आला. त्यानंतर रात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास एक बिबट्या या पिंजऱ्यात अडकला. सकाळी ही माहिती परिसरात समजताच बिबट्याला पाहण्यासाठी नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.

मात्र, एक बिबट्या जेरबंद झाला असला तरी परिसरातील बिबट्यांचा धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नाही. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, या भागात आणखी दोन ते तीन बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे वनविभागाने या परिसरात अधिक लक्ष देऊन आवश्यक त्या ठिकाणी आणखी पिंजरे लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

एक बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी परिसरातील उर्वरित बिबट्यांचा शोध घेऊन नागरिकांची भीती दूर करण्याचे मोठे आव्हान वनविभागासमोर आहे.

मुठेवाडगाव सोसायटीत सत्तांतराची चाहूल; चेअरमनचे सहीचे अधिकार बबनराव मुठे यांना

नऊ संचालकांच्या बहुमताने ठराव मंजूर; द्वारका मुठे यांचे अधिकार काढले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मुठेवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेत मोठी राजकीय घडामोड घडली आहे. संस्थेच्या विद्यमान चेअरमन द्वारका मुठे यांचे सहीचे अधिकार काढून भाजपचे माजी तालुकाध्यक्ष बबनराव मुठे यांना चेअरमन दर्जाचे सहीचे अधिकार देण्याचा ठराव नऊ संचालकांच्या बहुमताने मंजूर करण्यात आला.

संस्थेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या १३ संचालकांपैकी नऊ संचालक उपस्थित होते, तर चार संचालक अनुपस्थित राहिले. बैठकीतील विषयपत्रिकेवरील सहीचे अधिकार देण्याच्या विषयावर चर्चा झाली. यावेळी बबनराव मुठे यांना सहीचे अधिकार देण्याची सूचना उपाध्यक्ष शिवाजी मुठे यांनी मांडली. त्यास माजी चेअरमन सुभाषराव मुठे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित नऊही संचालकांनी ठरावाला पाठिंबा दिला.

या बैठकीला द्वारका मुठे, डॉ. शंकरराव मुठे, संभाजी गोसावी आणि भागवत मुठे अनुपस्थित होते. ठराव मंजूर झाल्यानंतर उपस्थित सदस्यांनी बबनराव मुठे यांचे अभिनंदन केले. संस्थेबाहेर जमलेल्या कार्यकर्ते व समर्थकांनीही आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी सरपंच सागर मुठे यांनी संस्थेतील घडामोडींमागील राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट केली. उपाध्यक्ष शिवाजी मुठे यांनी जिल्हा बँकेच्या ठरावावरून निर्माण झालेल्या नाराजीचा उल्लेख केला. तर बबनराव मुठे यांनी १९९५ पासूनच्या राजकीय वाटचालीत गावाने दिलेल्या पाठबळाबद्दल आभार मानले. सहीचे अधिकार देणाऱ्या नऊही संचालकांचे त्यांनी आभार व्यक्त केले. या निर्णयामुळे मुठेवाडगाव परिसरातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांची नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

श्रीरामपूर डाक विभागाद्वारे 'दिवाळी' चा २४ देशांत ६३४ किलोहून अधिक फराळ रवाना

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : यंदाच्या दिवाळी सणानिमित्त परदेशात शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेल्या आपल्या प्रियजनांपर्यंत घरचा दिवाळी फराळ व शुभेच्छा पोहोचवण्यासाठी श्रीरामपूर डाक विभागातील नागरिकांनी भारतीय डाक विभागाच्या आंतरराष्ट्रीय पार्सल सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

श्रीरामपूर डाक विभागामार्फत यंदा जगभरातील २४ देशांमध्ये एकूण ६७ आंतरराष्ट्रीय पार्सलद्वारे ६,३४,३५२ ग्रॅम (सुमारे ६३४ किलो ३५२ ग्रॅम) वजनाचा दिवाळी फराळ व भेटवस्तू यशस्वीरित्या पाठवण्यात आल्या आहेत. खाजगी कुरिअर सेवांच्या तुलनेत भारतीय डाक विभागाची आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि किफायतशीर असल्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्राहकांनी पोस्टाच्या सेवेवर मोठा विश्वास दाखवला आहे.

प्रमुख देश व पार्सलची आकडेवारी:

यंदा सर्वाधिक पार्सल जपान येथे पाठवण्यात आले असून, त्याखालोखाल अमेरिका, जर्मनी, सिंगापूर आणि रशिया येथे हा फराळ पाठवण्यात आला आहे.

जपान : १२ पार्सल (वजन: १४२.२९ किलो), अमेरिका (USA): ८ पार्सल (वजन: ६५.८७ किलो), जर्मनी: ६ पार्सल (वजन: ५७.८४ किलो), सिंगापूर: ३ पार्सल (वजन: ५७.१९ किलो), रशिया: ४ पार्सल (वजन: ४९.८३ किलो), ऑस्ट्रेलिया: ४ पार्सल (वजन: ३५.७६ किलो), स्वित्झर्लंड: २ पार्सल (वजन: ३०.४९ किलो), संयुक्त अरब अमिराती (UAE / दुबई): २ पार्सल (वजन: २५.२० किलो), नेदरलँड्स: ४ पार्सल (वजन: २५.०४ किलो), युनायटेड किंगडम (UK): ३ पार्सल (वजन: २०.४९ किलो), पार्सल पाठवण्यात आलेल्या सर्व २४ देशांमध्ये जपान, अमेरिका (USA), जर्मनी, रशिया, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, सिंगापूर, युनायटेड किंगडम (UK), माल्टा, कॅनडा, स्वित्झर्लंड, संयुक्त अरब अमिराती (UAE), जॉर्जिया, फिलीपिन्स, नॉर्वे, इटली, झेकिया (Czechia), मालदीव, फ्रान्स, लाटव्हिया, टांझानिया, व्हेनेझुएला, आयर्लंड आणि सौदी अरेबिया या देशांचा समावेश होतो.

भारतीय डाक विभागाच्या 'आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट' (EMS), 'इंटरनॅशनल एअर पार्सल' आणि 'इंटरनॅशनल ट्रॅक्ड पॅकेट सर्व्हिस' (ITPS) या सेवांमुळे ग्राहकांना घरबसल्या पार्सल ट्रॅकिंगची सुविधा मिळते. श्रीरामपूर विभागातील सर्व मुख्य व उपडाकघरांमधून या पार्सलचे अचूक आणि वेळेत बुकिंग करण्यात आले होते. परदेशात पार्सल पाठवण्यासाठी नागरिकांनी डाक विभागावर मोठा विश्वास दाखविला असल्याची प्रतिक्रिया डाक अधीक्षक उमेश जनवाडे यांनी दिली.

टेम्पोमधून देशी भिंगरी दारूचे ३३ बॉक्स चोरणारे दोन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा खुर्द येथे उभ्या असलेल्या आयशर टेम्पोमधून देशी भिंगरी दारूचे ३३ बॉक्स चोरून नेणाऱ्या दोन आरोपींना नेवासा पोलिसांनी शोधून काढत धडक कारवाई केली आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून चोरीस गेलेला १ लाख १६ हजार ७०३ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२.३० ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीने आपला आयशर टेम्पो नेवासा खुर्द येथील मळगंगा मंदिरासमोर, नेवासा-नेवासा फाटा रस्त्यावर उभा केला होता. झोप लागल्याने फिर्यादी टेम्पोमध्येच झोपलेला असताना अज्ञात चोरट्यांनी टेम्पोमधील देशी भिंगरी कंपनीच्या दारूचे ३३ बॉक्स, किंमत १ लाख १६ हजार ७०३ रुपये, चोरून नेले. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९१२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, सचिन ऊर्फ गण्या राजेंद्र पवार व आकाश भिमा इंगळे (दोघेही रा. खरवंडी, नेवासा खुर्द, ता. नेवासा) यांचा या चोरीत सहभाग असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी विशेष पथकाला कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी दोन्ही संशयितांचा शोध घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश नागरगोजे करीत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कामगिरी ही कामगिरी पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे तसेच शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत सहायक फौजदार गणेश नागरगोजे, पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष शिंदे, रविंद्र शेळके, पोलीस कॉन्स्टेबल राहुल खंडागळे, गणेश फाटक व संदीप ढाकणे यांनी सहभाग घेतला.